SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा... | थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला ▸ कापड बाजार, फोन नं. 7666510765 ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर. ▸ सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २९.०६.२०२६ | अंक नं. ०७६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

IGI सर्टीफाईड डायमंड ज्वेलरी आता आपल्या बजेटमध्ये !
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply

# बाजारपेठेतील 'हॅलोजन' दिवसाही सुरुच

## विजेचा अपव्यय; नासाडी करणाऱ्यांवर वीजचोरांप्रमाणेच कारवाई करा

नगर – एकीकडे देशभर विजेचा तुटवडा असताना, दुसरीकडे मात्र विजेचा अपव्यय देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. शहरातील डाळमंडई परिसरात मागील काही दिवसांपासून 'हॅलोजन दिवे' चोवीस तास (रात्रंदिवस) सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने देशवासीयांना ऊर्जा बचतीचे आवाहन करत आहेत. तर काही निष्काळजी शासकीय कर्मचारीच या आवाहनाला हरताळ फासत असल्याचे चित्र आहे. स्थानिक प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे विजेची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.







सध्या ग्रामीण भागांत पुरेशा विजेअभावी भारनियमन किंवा वीज खंडित होण्याच्या समस्यांना जनतेला सामोरे जावे लागत आहे. शहरातील तसेच उपनगरांमधील काही रस्ते पथदिव्यांअभावी अंधारात बुडालेले असतात तर काही गल्ल्यांमध्ये पथदिवे असूनही ते सुरू होत नसल्याने रात्रीच्या वेळी या गल्ल्या आणि रस्त्यांवर काळोखाचे साम्राज्य पसरलेले असते. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. मात्र, याउलट डाळमंडई भागात भरदिवसाही हे शक्तिशाली 'हॅलोजन दिवे' सुरुच असल्याने प्रशासनाचा धृतराष्ट्रीय कारभार चव्हाट्यावर आला आहे.

एकीकडे सर्वसामान्यांना वीज बचतीचे धडे दिले जातात आणि दुसरीकडे सरकारी यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे शेकडो युनिट वीज दिवसाढवळ्या वाया घालवली जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली आहे.

या प्रकाराकडे संबंधित विभागाने त्वरित लक्ष देऊन हे दिवे दिवसा बंद करावेत आणि जबाबदार कर्मचाऱ्यांवर वीज चोरांप्रमाणेच कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांच्यावतीने करण्यात आली.

# अहिल्यानगर जिल्ह्यास पुन्हा 'यलो अलर्ट' जारी

## २९ जून ते ३ जुलैदरम्यान वादळी वारा, विजांचा कडकडाटासह मध्यम पाऊस

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात २९ जून ते ३ जुलै या कालावधीत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारे, विजांचा कडकडाट तसेच मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान खात्याने निर्गमित केलेल्या अंदाजानुसार वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यास यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, जिल्हा प्रशासनाने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जवळच्या पोलीस स्टेशन, तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष-दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४, २३५६९४० किंवा ११२, १०७७ (टोल फ्री) वर संपर्क साधण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती प्राधिकरणाचे सीईओ दादासाहेब गिते यांनी केले आहे.

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय
लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६
६ इन १ १२०ग्रॅम
रु. 65 चा रु. 50 मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी
निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते
स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर

# नसरापूर प्रकरणी आरोपी भीमराव कांबळेला फाशी



पुणे – भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या भीमराव कांबळे (वय ६५) याला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने २९ जूनला फाशीची शिक्षा सुनावली. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा निकाल दिला.

यापूर्वी २५ जून झालेल्या सुनावणीत न्यायालयाने भीमराव कांबळे याला दोषी ठरवले होते. त्यानंतर आरोपीला फाशी की जन्मठेप यापैकी कोणती शिक्षा सुनावणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर न्यायालयाने हा गुन्हा अत्यंत क्रूर स्वरूपाचा असल्याचे नमूद करत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली.

या प्रकरणात गुन्हा घडल्यापासून अवघ्या ५५ दिवसांत तपास, आरोपपत्र, सुनावणी आणि निकालाची प्रक्रिया पूर्ण झाली. अत्याचार व खुनाच्या गुन्ह्यात इतक्या कमी कालावधीत निकाल लागलेला हा राज्यातील पहिलाच खटला ठरला असून, देशातील सर्वात जलदगतीने निकाली निघालेल्या गंभीर गुन्ह्यांपैकी हा दुसरा खटला मानला जात आहे. १ मे २०२६ रोजी नसरापूर येथील साडेतीन वर्षांची चिमुकली बेपत्ता झाली होती. काही वेळानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्यात आढळून आला. तपासात तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या झाल्याचे स्पष्ट झाले.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये भीमराव कांबळे हा चिमुकलीचा हात धरून घेऊन जाताना स्पष्ट दिसत होता. त्याआधारे पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. तपासादरम्यान डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, घटनास्थळावरील नमुने, साक्षीदारांचे जबाब आणि अन्य वैज्ञानिक पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली होती. शिक्षा सुनावताना न्यायालयाने हा गुन्हा अत्यंत अमानुष आणि समाजमन हादरवणारा असल्याचे नमूद केले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. निकालावेळी न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### देशातील सर्वात जलद निकाल

या प्रकरणात तपास यंत्रणांनी अवघ्या १५ दिवसांत तपास पूर्ण करून सुमारे १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर न्यायालयाने जलदगतीने सुनावणी पूर्ण करत निकाल दिला. बलात्कार व हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यात घटनेपासून शिक्षेपर्यंतचा प्रवास सुमारे ५५ दिवसांत पूर्ण झालेल्या देशातील मोजक्या प्रकरणांमध्ये या खटल्याची नोंद झाली आहे. यापूर्वी उत्तर प्रदेशातील बहराईच येथील अल्पवयीन मुलीवरील बलात्कार व हत्या प्रकरणातही सुमारे ५५ दिवसांत मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. देशातील सर्वात जलद निकालांमध्ये या दोन्ही निकालांचे ऐतिहासिक महत्व आहे.

**घटनाक्रम**

१ मे : नसरापूर येथून साडेतीन वर्षांची मुलगी बेपत्ता; काही वेळाने मृतदेह आढळला.

२ मे : सीसीटीव्ही व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे भीमराव कांबळे याला अटक.

१६ मे : सुमारे १२०० पानी आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल.

२८ मे : आरोपीविरुद्ध आरोप निश्चित; खटल्याच्या सुनावणीला प्रारंभ.

२५ जून : न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले; शिक्षेचा निर्णय राखून ठेवला.

२९ जून : विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली.

3 BHK फ्लॅट भाड्याने देणे
आनंदधाम परिसरात फुली फर्निश्ड/ नॉन फर्निश्ड फ्लॅट भाड्याने देणे.
तेजस कोठारी यांचे
नमीत प्रॉपर्टीज
(नगर - पुणे - मुंबई - दुबई)
8421953963

तातडीने फ्लॅट विकणे आहे
अहिल्यानगरमधील कायनेटिक चौक परिसरातील प्रियंका कॉलनी, लक्ष्मी कृपा हाऊसींग सोसायटी (गणेश मंदिराच्या मागे) येथील त्रिकाया अपार्टमेंटमध्ये ३ ऱ्या मजल्यावर 2BHK फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध आहे.
* वैशिष्ट्ये : ४ मजली इमारत, लिफ्टची सोय, उत्कृष्ट आणि दर्जेदार बांधकाम
* विशेष : शहराच्या इतर ठिकाणांच्या तुलनेत अगदी कमी किमतीत आणि तातडिने विकणे आहे
* ठिकाण : रेल्वे ट्रॅक शेजारी, कायनेटिक चौक, अहिल्यानगर
संपर्क : मो. 8329292811 / 8999335649

Urgent Required
In Ahilyanagar and Kedgaon
Teacher cum Co-Ordinator
• Desired Qualification :
Bsc / Msc / GNM / Bsc Nursing / ANM/ D Pharm/ B Pharm / M Pharm/ B Tech / M Tech/ DMLT / PG DMLT / Any Paramedical Course/BHMS/ BAMS
- Contact -
Siddhi Paramedical Institute
9145 155 955 / 9823 255 355

UPGRADE YOUR KITCHEN WITH NEW HOME APPLIANCES
ANYTHING FOR ANYTHING
LIMITED PERIOD OFFER
20% TO 40% OFF ON MEGA EXCHANGE
खास ग्राहकांच्या आग्रहास्तव ऑफर ३१ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.
(सोमवारी विश्रांती)
OPP. GOLD'S TV CENTRE, SAVEDI ROAD, AHILYANAGAR - 3 PH. : 0241-2427001/02
Franchise by DB VENTURES
SONY GIFTS PVT. LTD. One Stop Shop

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा: आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. 9371051769
जुने बस स्टँड शाखा: अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर. 9371151769
पाईपलाईन शाखा: रुपा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मोपेडवरुन चाललेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावली

### बालिकाश्रम रोडवरील घटना, दोघा चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील बालिकाश्रम रोड परिसरात दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाची सोन्याची चेन दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तरुणा कालडा (वय ४४, रा. बागरोजा हाडको, दिल्लीगेट, अहिल्यानगर) यांनी २७ जून रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी या २३ जून रोजी सकाळी ८.४८ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोपेडवरून बालिकाश्रम रोडने जात होत्या. सुखदा हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर स्पीड ब्रेकर आल्याने त्यांनी दुचाकीचा वेग कमी केला. त्याचवेळी पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांपैकी मागे बसलेल्या, इसमाने त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाची, सोन्याची चेन बळजबरीने ओढून हिसकावली आणि दोघेही घटनास्थळावरून वेगाने पसार झाले. या घटनेनंतर तरूणा कालडा यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात माहिती दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करीत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

# पान व्यावसायिकांवर सुरू असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ ७ जुलै रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर 'धडक मोर्चा'

### ३ जुलैला अहिल्यानगरमध्ये पान व्यावसायिकांचा मेळावा; राज्यभरातील व्यापाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन




नगर – महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाकडून पान व्यावसायिकांवर सुरू असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाने राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली असून, ७ जुलै रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धडक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात राज्यभरातील लाखो पान व्यावसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष फैय्याज तांबोळी यांनी केले आहे.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ३ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनच्या वतीने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सीताबन लॉन, सुखसागर हॉटेल मागे, कोठी रोड, मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथे सकाळी ११ वाजता हा मेळावा होणार असून, महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी उपस्थित राहून व्यावसायिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईमुळे राज्यातील पानपट्टीधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुगंधित तंबाखूवरील बंदी, मोक्का अंतर्गत कारवाई, तसेच पान व्यावसायिकांवर होत असलेल्या कथित अन्यायकारक कारवायांमुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

मोर्चाद्वारे शासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात येणार असून, त्यामध्ये अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबविणे, सुगंधित तंबाखूवरील बंदी उठविणे, पानपट्टीधारकांना आर्थिक मदत व कर्जसुविधा उपलब्ध करून देणे, प्रत्येक पान दुकानधारकाच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय किंवा निमशासकीय नोकरीत सामावून घेणे, तसेच पान व्यवसायासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पानपट्टीधारक, होलसेल व्यापारी, फेरीवाले आणि संबंधित सर्व व्यावसायिकांनी ३ जुलैच्या मेळाव्यास तसेच ७ जुलैच्या मुंबई मोर्चात सहभागी होऊन संघटनेची ताकद दाखवावी, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी यांच्या वतीने करण्यात आले.

# अंमलीपदार्थ विरोधात जिल्हाभरात मोहीम

### एकाच दिवसांत ६४ ठिकाणी कारवाई, गांजा पिणाऱ्यांवर गुन्हे दाखल

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात पोलीस प्रशासनाने अंमलीपदार्थ विक्री, तस्करी आणि सेवन करणाऱ्यांच्या विरोधात धडक मोहीम सुरु केली असून २८ जून रोजी जिल्हाभरात एकाच दिवशी तब्बल ६४ ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. गांजा हा अंमलीपदार्थ पिणाऱ्या ६४ जणांच्या विरोधात विविध पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नगर शहरासह जिल्हाभरात अंमली पदार्थांच्या वाढत्या विक्री आणि तस्करीमुळे तरुणाई व्यसनाच्या आहारी जाऊ लागली आहे. या बाबत मागील आठवड्यात भाजपाच्या वतीने पोलीस अधिक्षक कार्यालयात आंदोलन करण्यात आले होते. अंमलीपदार्थांची तस्करी हा केवळ नगर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभरात चिंतेचा विषय ठरला आहे. याबाबत विधानसभेच्या सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनातही जोरदार चर्चा झाली होती. या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरात अंमलीपदार्थ विक्री व तस्करी रोखण्यासाठी व्यापक मोहीम हाती घेण्यात येईल असे जाहीर केले होते. त्यानुसार जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना धडक मोहीम राबविण्याचे आदेश दिले.

या आदेशानुसार सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकांनी आपल्या हद्दीत २८ जून रोजी शोध मोहीम राबविली. या मोहिमेत गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करताना ६४ जण आढळून आले. या सर्वांना ताब्यात घेवून त्यांच्या विरुद्ध एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८ (क) सह २७ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये नगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात ११, कोतवाली ३, भिंगर कॅम्प ३, एमआयडीसी ७, नगर तालुका ३, शिर्डी ३, सुपा २, श्रीरामपूर २, सोनई ३, कर्जत २, कोपरगाव ५, लोणी ३, बेलवंडी १, श्रीगोंदा ११, अकोले २, संगमनेर २, शनी शिंगणापूर १ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अंमलीपदार्थ विरोधात सुरु असलेली ही मोहीम अधिक मोठ्या प्रमाणात राबविण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी दिले आहेत.

# नगरमध्ये गोमांस विक्री करणाऱ्यांवर पोलिसांचा छापा; २३० किलो गोमांससह ७६ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

नगर –शहरातील बेलदार गल्ली परिसरात मिसगर लायब्ररीसमोरील बेकायदेशीरपणे गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्यांचे मांस विकण्याच्या उद्देशाने बाळगणाऱ्या टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे २३० किलो मांस आणि कत्तलीसाठी वापरले जाणारे साहित्य असा ७६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला बेलदार गल्ली परिसरात गोमांस विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार या माहितीच्या आधारे २८ जून रोजी सकाळी ११.१२ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. घटनास्थळावरून पोलिसांनी एकूण ७६,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये २३० किलो मांसाचे तुकडे, सत्तूर, सुरा, वजन काटा आणि मांस व खिमा बनवण्याची स्टीलची मशीन जप्त करण्यात आली आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आयनुल फयाज अहमद कुरेशी, मुनाव्वर फकीर सय्यद, नविद रफिक कुरेशी, सन्तीम कथ्याज अहमद कुरेशी, नजिब नजिर कुरेशी (सर्व रा. सुभेदार गल्ली, झेंडिगेट, अहिल्यानगर)या संशयित आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ चे कलम २७१, ३२३ आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम कलम ५ बी, ५ सी नुसार गुन्हा दाखल केला आहे.

तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे.कॉ. आव्हाड पुढील तपास करत आहेत.

# दुभाजकावर रेडियम रिफ्लेक्टर नसल्यामुळे होत आहेत अपघात; तातडीने उपाययोजना करा, अन्यथा आंदोलन

### दिल्लीगेट परिसरासह शहरातील दुभाजकांची उपमहापौर धनंजय जाधव यांनी केली पाहणी

नगर – दिल्ली गेट रस्त्यावरील नव्याने उभारलेल्या दुभाजकामुळे गेल्या पंधरा दिवसांपासून वारंवार अपघात होत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दुभाजक स्पष्टपणे दिसत नसल्याने चारचाकी व दुचाकी वाहने त्यावर आदळत आहेत. एखादी दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी दिला आहे.

दुभाजकावर रेडियम रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक तसेच वाहतूक नियम दर्शविणारे पट्टे नसल्यामुळे वाहनचालकांना दुभाजकाचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे जाधव यांनी सांगितले.

यासंदर्भात उपमहापौर धनंजय जाधव यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शहर अभियंता श्रीकांत निंबाळकर, सुनील सुडके, धीरज रोहोकले, राजेंद्र येंडे, बाळासाहेब सांगोळे आदी उपस्थित होते.


शहरातील दुभाजकाची पाहणी करताना उपमहापौर धनंजय जाधव आदी. (छाया – लहू दळवी)

# टीईटी पेपरफुटीप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा; अन्यथा तीव्र आंदोलन

नगर – शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर तातडीने आणि कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते प्रा. अमोल खाडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २८ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेस राज्यभरातून चार लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी अर्ज केला असून, त्यामध्ये सुमारे सव्वा दोन लाख सेवेतील शिक्षकांचाही समावेश आहे. अनेक विद्यार्थी वर्षानुवर्षे कठोर परिश्रम, आर्थिक अडचणी आणि मानसिक तणाव सहन करून या परीक्षेची तयारी करतात. अशा परिस्थितीत पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत असल्याची भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी प्रा. अमोल खाडे म्हणाले, शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणारे हजारो युवक–युवती दिवस–रात्र अभ्यास करून परीक्षेची तयारी करतात. मात्र काही मोजक्या भ्रष्ट प्रवृत्तींच्या कृतीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे. पेपरफुटी हा केवळ कायद्याचा भंग नसून विद्यार्थ्यांच्या विश्वासाशी केलेला विश्वासघात आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येक आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे, तरच भविष्यात अशा घटना थांबतील.

ते पुढे म्हणाले, सरकार आणि प्रशासनाने या प्रकरणाकडे केवळ गुन्हा म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय म्हणून पाहण्याची गरज आहे. निष्पक्ष चौकशी करून संपूर्ण रॅकेट उघडकीस आणावे, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, असा ठोस संदेश द्यावा. विद्यार्थ्यांचा संयम संपुष्टात येऊ नये, यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे.

निवेदनात प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. पेपरफुटीमुळे स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, त्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रशासनावरील विश्वास ढासळत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, दोषींवर तातडीने कठोर कारवाई न झाल्यास विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला असून, त्या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही प्रा. अमोल खाडे यांच्यासह निवेदन देताना उपस्थित सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले.

# फळविक्रेत्याला लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण

नगर – छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील एम्स रुग्णालयासमोर एका फळविक्रेत्याला अडवून तिघांनी लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना २८ जून रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतिक सलीम बागवान (वय १६, रा. परशा खुंट, पिंजार गल्ली, अहिल्यानगर) असे मारहाणीत जखमी झालेल्या फळविक्रेत्याचे नाव असून त्याने या प्रकरणी पोलिसात फिर्याद दिली आहे. फिर्यादी अतिक बागवान हा २८ जून रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास एम्स रुग्णालयासमोरून जात असताना मोपेड वाहनावरून तीन आरोपी आले. यामध्ये मोहीज फय्याज शेख, करीम शेख आणि जहीद जावेद शेख (सर्व रा.पिंजारगल्ली, अहिल्यानगर) यांनी अतिकला रस्त्यावर पाडून लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या बेदम मारहाणीत अतिक गंभीर जखमी झाला असून त्याला रस्त्यावर ओढत नेऊन शिवीगाळ करण्यात आली. आरोपींनी त्याचे हातपाय तोडून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच मारहाण करत असताना अतिकचा मोबाईल फोन खाली फेकून तोडून टाकल्यामुळे त्याचे मोठे नुकसान झाले आहे. जखमी अतिकला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वर्षानुवर्षे बंद असलेली गंज बाजार पोलीस चौकी त्वरित सुरु करा

### भाजपा व्यापारी आघाडीची एसपींकडे मागणी

नगर – शहरातील गंज बाजार परिसरात असलेली पोलीस चौकी वर्षानुवर्ष बंदच आहे. त्यामुळे या भागासह बाजारपेठ्यांम्ध्ये सातत्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी गंज बाजार पोलीस चौकी त्वरित सुरु करून तेथे २४ तास कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवा, या मागणीचे निवेदन शहर भाजपच्या व्यापारी आघाडीच्या वितीने जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांना देण्यात आले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सरचिटणीस निखिल वारे, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे, सरचिटणीस हर्षल बोरा, देवेंद्र दुधाले, लक्ष्मिकांत तिवारी, महावीर कांकरिया, हेमंत पवार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पोलीस अधिक्षक मम्मूका सुदर्शन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच योग्य कार्यवाही करू, असे सागितले.


गंज बाजार पोलीस चौकी त्वरित पुन्हा सुरु करून तेथे २४ तास कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या मागणीचे निवेदन भाजपा व्यापारी आघाडीच्या वतीने पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांना देण्यात आले.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील गंज बाजार परिसर गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात विकसित झाला असून या भागातील वसाहती, दुकाने, रहदारीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र या परिसरात असलेली पोलीस चौकी गेल्या अनेक वर्षापासून बंद आहे. त्यामुळे याभागात सातत्यने चोरी, भांडणे, वाहतूक कोंडी व इतर कायदा–सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण होत आहेत. नागरिक व व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही पोलीस चौकी लवकरात लवकर पुन्हा कार्यान्वित करावी.

या पोलीस चौकीमुळे गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटून नागरिकांना तत्काळ मदत मिळणे शक्य होईल.

## सदाशिव राठोड (सर) यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सदाशिव फकिरचंद राठोड (सर) (वय ९६) यांचे २९ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे ४ विवाहित मुले, विवाहित मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. हातमपूरा बॉईज् हायस्कूलला ते अनेक वर्षे शिक्षक म्हणून कार्यरत होते. गुलमोहोर रोड येथील जनता ऑईल डेपोचे ते संचालक होत.

## मैनाबाई गुंदेचा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सीताबन लॉन परिसरातील मैनाबाई श्रीमल गुंदेचा (वय ७९) यांचे २८ जून रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी दुपारी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पती, मुले मनोज, महेश गुंदेचा, मुलगी उज्वला, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीमल रूपचंद गुंदेचा (साईनाथ दलाल) यांच्या त्या पत्नी होत.

# घरातून चोरीला गेलेल्या पैशांबाबत विचारपूस केल्याने केडगावात कुटुंबाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण

नगर – घरातील पैसे चोरीला गेल्याच्या संशयावरून विचारपूस केल्याच्या रागातून महिलेसह तिच्या मुलाला लाकडी दांडक्याने व केबल वायरने बेदम मारहाण केल्याची घटना केडगाव परिसरातील लिंक रोडवरील कारमेल शाळेजवळ २७ जून रोजी दुपारी घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात ५ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत इंदू शंकर धोत्रे (वय ३७, रा. कारमेल शाळेजवळ, लिंक रोड केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या घरातील १६ हजार रुपयांची रोख रक्कम चोरीला गेली होती. या चोरीबाबत फिर्यादी यांनी संशयित आरोपी सरस्वती नितीन चव्हाण आणि तिच्यासोबत असलेल्या इतर चार अनोळखी व्यक्तींकडे विचारपूस केली. चोरीचा जाब विचारल्यामुळे आरोपींचा राग अनावर झाला. त्यांनी फिर्यादीच्या अंगावर धावून जात लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

आरोपी सरस्वती चव्हाण हिने हातातील लाकडी दांडके फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. यावेळी फिर्यादीचा मुलगा मध्यस्थी करण्यासाठी धावला असता, इतर तीन अनोळखी इसमांनी त्यालाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाण केल्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या घराचा दरवाजा तोडून मोठ्या प्रमाणावर नुकसान करत घरातून पळ काढला.

या जीवघेण्या हल्ल्यानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांनी शासकीय रुग्णालयात जाऊन जखमींचा जबाब नोंदवून घेतला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी आरोपी सरस्वती नितीन चव्हाण आणि इतर चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गोविंद गोल्हार हे करत आहेत.

# इन्स्टाग्राम स्टेटस ठेवल्याच्या रागातून तरुणाला जिवे मारण्याची धमकी

नगर – मित्राच्या मयत झालेल्या भावाचा फोटो इन्स्टाग्रामवर स्टेटस म्हणून ठेवल्याच्या कारणावरून एका तरुणाला फोन करून अश्लील शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २८ जून रोजी सायंकाळी सर्जेपुरा परिसरात घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आदेश भरत भागानगरे (वय १८, रा. कॅम्प कौलारू, सर्जेपुरा) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा फिटर म्हणून काम करतो. आदेश आणि त्याचा मित्र अलीम तन्वीर शेख हे दोघे जण चांगले मित्र आहेत. अलीम याचा भाऊ अकवान तन्वीर शेख याचा मृत्यू झालेला असल्याने, आदेशने आपल्या मित्राच्या दिवंगत भावाचा फोटो आदरांजली म्हणून आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर स्टेटस म्हणून ठेवला होता. हा स्टेटस पाहिल्यानंतर मुकुंदनगर भागात राहणारा आरोपी जक्की वसीम शेख याला या गोष्टीचा प्रचंड राग आला.

या कारणावरून आरोपी जक्की शेख याने थेट आदेश भागानगरे याला फोन केला आणि इन्स्टाग्रामवर फोटो स्टेटस का ठेवला, अशी विचारणा करत वाद घालण्यास सुरुवात केली. वाद वाढल्यानंतर आरोपीने आदेशला फोनवरच अश्लील भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता त्याने आदेशला थेट जिवे मारण्याची धमकी दिली.

या धमकीनंतर आदेश भागानगरे याने तातडीने तोफखाना पोलीस ठाणे गाठून आरोपीविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत आरोपी जक्की वसीम शेख याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५२ आणि ३५१(२) प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### झोप ठरेल नैसर्गिक औषध

पुरेशी झोप ठरेल 'नैसर्गिक औषध'झोप हा शरीराचा चार्जर आहे, पण आजच्या धावपळीत आपण त्यालाच 'वेळेचा अपव्यय' मानतो. प्राचीन आयुर्वेदात झोपेला 'भूतधात्री' म्हणजेच शरीराचे पोषण करणारी म्हटले आहे आणि आता आधुनिक विज्ञानानेही याला 'नैसर्गिक औषधा'चा दर्जा दिला आहे. रोज ७-८ तास शांत झोप घेतल्याने मेंदू, हृदय आणि रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहते.झोपेत शरीराची दुरुस्ती होते, दिवसभराचा थकवा निघून जातो आणि हार्मोन्स संतुलित राहतात. यातील खास गोष्ट म्हणजे 'मेलाटोनिन' नावाचे हार्मोन स्त्रवते, जे कॅन्सरसारख्या आजारांपासून बचाव करते आणि त्वचा तजेलदार ठेवते. स्मरणशक्ती वाढवण्यासाठी झोप रामबाण आहे कारण झोपेतच मेंदू दिवसभराची माहिती साठवतो. लठ्ठपणा, मधुमेह आणि डिप्रेशनसाठी डॉक्टर पहिला सल्ला पुरेशी झोप घेण्याचा देतात. रात्री १० ते पहाटे ४ ही वेळ झोपेसाठी उत्तम मानली जाते. झोपण्यापूर्वी मोबाईल-टीव्ही बंद करणे, कोमट दूध पिणे किंवा ध्यान करणे उपयोगी ठरते. आयुर्वेदात योग्य झोपेला बळ वाढवणारी व आयुष्य वाढवणारी क्रिया मानले आहे. कोणत्याही महागड्या गोळ्या-औषधांशिवाय झोप सहज, फुकट आणि शरीराची स्वतःची उपचार पद्धत असल्याने अधिक गुणकारी ठरते.

## पाककला

### कुरकुरीत व्हेज कटलेट

**साहित्य :** उकडलेले बटाटे २ मध्यम, बारीक चिरलेला गाजर १/२, मटार १/२ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ लहान, आले-लसूण पेस्ट १ चमचा, ब्रेड क्रम्स १ वाटी, बेसन २ चमचे, १ चमचा लाल तिखट, १/२ चमचा गरम मसाला, १/२ चमचा चाट मसाला, १/४ चमचा हळद, १/४ चमचा मीठ, चवीनुसार कोथिंबीर २ चमचे, तळण्यासाठी तेल

**कृती :** उकडलेले बटाटे कुस्करून घ्या. त्यात वाफवलेले गाजर, मटार, चिरलेला कांदा, आले-लसूण पेस्ट, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, हळद, मीठ आणि कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करा. मिश्रणाचे लहान गोळे करून चपटे कटलेट थापा. एका प्लेटमध्ये बेसनाचे पातळ पीठ करा. कटलेट बेसनात बुडवून ब्रेड क्रम्समध्ये घोळवा. कढईत तेल गरम करून मध्यम आचेवर कटलेट सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. टिश्यू पेपरवर काढून जास्तीचे तेल निथळा. तयार गरमागरम कटलेट पुदिना चटणी आणि टोमॅटो सॉसबरोबर सर्व्ह करा. संध्याकाळच्या चहासोबत एकदम बेस्ट लागतात.

## वास्तू

### समुद्रिक सल्ला

### तर्जनीव अनामिका

✻ तर्जनी बोट अनामिकेपेक्षा लांब असेल तर व्यक्ती नेतृत्व गुणाची असते. नोकरीत मोठी पदे मिळतात.

करंगळीचा शेंडा अनामिकेच्या पहिल्या पेरापर्यंत पोहोचत असेल तर बोलण्यात हुशार असते. व्यापारात यश मिळते.

✻ अंगठा जाड आणि कडक असेल तर व्यक्ती हट्टी असते. पण एकदा ठरवलं की काम पूर्ण केल्याशिवाय राहत नाही.

## सौंदर्य

✻ केसांना नैसर्गिक चमक हवी असेल तर शॅम्पूनंतर शेवटच्या मगात २ चमचे सफरचंदाचे व्हिनेगर घालून केस धुवा. २ मिनिटांत केस रेशमी होतील.

✻ नखे पिवळी पडत असतील तर लिंबाच्या सालीने २ मिनिटे नखे घासा. नखे पांढरी होतात.

## सल्ला

कढीपत्त्याची देठे एका ग्लासमध्ये थोडे पाणी घालून फ्रीजच्या दारात ठेवा. रोज पाणी बदला. ताजा राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. ३० जून २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, पू.षा.अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज नशिबाची साथ मिळेल. जुनी गुंतवणूक फायद्यात येईल.

**वृषभ :** कोर्ट-कचेरीची कामे मार्गी लागतील. जमिनीच्या व्यवहारात यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन :** स्पर्धा परीक्षेत यश मिळेल. लेखन, भाषण क्षेत्रात नाव होईल. मित्रांकडून मदत मिळेल. छोटा प्रवास घडेल.

**कर्क :** कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. आई-वडिलांचे आशीर्वाद मिळतील. घरासाठी नवीन वस्तू खरेदी होईल.

**सिंह :** सरकारी कामात यश मिळेल. राजकीय क्षेत्रात मान वाढेल. धाडसी निर्णय फायद्याचे ठरतील. समाजात प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** व्यापारात तेजी येईल. नवीन ऑर्डर मिळतील. नोकर वर्गाचे सहकार्य लाभेल. तब्येतीत सुधारणा होईल.

**तूळ :** भागीदारीतून लाभ होईल. वैवाहिक जीवनात गोडवा वाढेल. कलेला वाव मिळेल.

**वृश्चिक :** कर्जातून मुक्ती मिळेल. शत्रू नरमाईची भूमिका घेतील. नोकरीत नवीन जबाबदारी मिळेल.

**धनु :** मुलांच्या प्रगतीची बातमी मिळेल. शिक्षण क्षेत्रात चमकाल. शेअर मार्केटमध्ये फायदा होईल. धार्मिक प्रवास घडेल.

**मकर :** घर, वाहन खरेदीचे योग आहेत. नोकरीत बदल अनुकूल ठरेल. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल.

**कुंभ :** भावंडांचे सहकार्य लाभेल. लेखन, प्रकाशन क्षेत्रात यश. छोटे प्रवास घडतील. नवीन कल्पना सुचतील.

**मीन :** बोलण्यातून कामे होतील. बँक बॅलन्स वाढेल. कुटुंबात शुभ कार्य घडेल. वाणीवर लोक खुश होतील.

## शब्दगंध क्र. ७४६२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | | |
| १० | | ११ | | ■ | १२ | | |
| | ■ | १३ | | | ■ | ■ | |
| ■ | १४ | | | ■ | १५ | ■ | ■ |
| १६ | | | ■ | १७ | | १८ | १९ |
| २० | | ■ | २१ | | | | |
| २२ | | | | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :-** १) करमणूक ५) एक अधिक पाव ७) पाढ्यातील सहाची संज्ञा ८) फार बलाढ्य १०) माणसांतील श्रेष्ठ १२) पापी लोक मृत्यूनंतर येथे जातात असे म्हणतात १३) दांत; सुळे १४) पराकाष्ठा; अतिशय प्रयत्न; पराभव; पाडाव १६) दार; द्वार; दरवाजा १७) एक मोगल राजा २०) कोणतेही सामान; शेतीतून आलेले धान्य २१) आकाशात विहार करणारे; पक्षी; खग २२) डोळ्यांना सुंदर दिसेल असे

**उभे शब्द :-** १) गादी; तख्त २) चाकर; पाईक; दास ३) जुलमी; श्रेष्ठ; खंबीर ४) श्रीरामाच्या वानरसेनेतील दोन प्रमुख वानरांपैकी एक ५) एक समसंख्या ६) वारीला जाणारा ९) अरण्य; जंगल; कानन ११) इतर; बाकीचे; गौण १४) शंकराचे मंदिर १५) कोंबडीचे मांस १६) धनुष्य; धनुष्याकृतीसारखे बांधकाम; महिरप १७) गूढ; रहस्यमय १८) कमाईतील थोडा भाग बाजूला काढून जमा करणे १९) रड; रडगाणे २१) फळातील रसाळ भाग; मगज

### शब्दगंध क्र. ७४६१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | नं | द | ■ | ला | ज | रा | ■ |
| ग | दि | मा | ड | गू | ळ | क | र |
| ■ | न | ■ | म | ■ | ■ | ट | क |
| आ | ■ | शि | ड | का | वा | ■ | म |
| र | त | ला | म | ■ | त | ळ | वा |
| स | ळ | ई | ■ | हे | ■ | ■ | र |
| पा | म | ■ | दे | वा | ल | य | ■ |
| नी | ळ | कं | ठ | ■ | ता | म | स |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** मोठं होण्यासाठी मोठी स्वप्नं बघावी लागतात, पण त्यासाठी छोटी पावलं टाकावी लागतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाण्यात दगड टाकल्यावर तरंग का उठतात?

एकविसाव्या शतकात मुलांच्या मनात हजारो प्रश्न येतात. शिक्षण, खेळ, टीव्ही सगळीकडे विज्ञान दडलेले आहे. मात्र अनेकदा आपण अनुभवतो की पाण्यात छोटासा दगड टाकला तरी मोठे तरंग उठतात. तलाव शांत असला तरी एका दगडाने सगळे पाणी हलते. या घटनेमागे फक्त पाणी नाही, तर ऊर्जा आणि शक्तीचा खेळ आहे. ही घटना एका कारणामुळे घडत नाही, तर अनेक वैज्ञानिक नियम एकत्र आल्याने तरंग तयार होतात.सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे ऊर्जेचे हस्तांतरण. दगड पाण्यावर पडतो तेव्हा त्याच्याकडची गतीज ऊर्जा पाण्याला मिळते. पाणी जागेवरून बाजूला सरकते आणि त्याची जागा घेण्यासाठी आजूबाजूचे पाणी धावते. यामुळे एक वर्तुळ तयार होते. दुसरे कारण म्हणजे गुरुत्वाकर्षण.

पाणी वर उचलले गेले की गुरुत्वाकर्षण त्याला खाली खेचते. वर-खाली होण्याच्या या क्रियेमुळे तरंग पुढे सरकत जातात. तलाव, नदी, समुद्रात हीच क्रिया मोठ्या लाटा तयार करते.दगड जड असेल तर तरंग मोठे उठतात, पण तो आधीच बुडला की नवीन तरंग येत नाहीत. वाऱ्याचे थेंब, पावसाचे टपोरे थेंबसुद्धा पाण्यावर पडून तरंग तयार करतात. म्हणून पावसाळ्यात तलावावर असंख्य वर्तुळे दिसतात. चौथे कारण आपल्या डोळ्यांचा भ्रम. तरंग गोल गोल सरकताना दिसतात, पण प्रत्यक्षात पाणी फक्त वर-खाली होत असते, पुढे जात नाही. अनेकदा मुलांच्या मनात प्रश्न येतो की तरंग किनाऱ्यापर्यंत का पोहोचतात? तरंगाची ऊर्जा हळूहळू कमी होत जाते. किनाऱ्याजवळ पाणी उथळ असल्याने घर्षण वाढते आणि तरंग विरून जातात.

ग्रामीण भागात हीच घटना विहिरीत बघायला मिळते. तेल किंवा मधासारख्या जाड द्रवात दगड टाकल्यास तरंग खूप छोटे आणि सावकाश पडतात. कारण जाड द्रवपदार्थात कण एकमेकांना घट्ट चिकटलेले असतात. समुद्रात त्सुनामीसारख्या मोठ्या लाटा याच तत्त्वावर तयार होतात. समुद्राच्या तळाशी भूकंप झाला की प्रचंड ऊर्जा पाण्यात मिसळते आणि हजारो किमी लांबवर लाटा जातात. लहान मुलांनी कागदाची होडी पाण्यात सोडली तरी तरंगामुळे होडी वर-खाली होते पण जागा सोडत नाही. यावरून समजते की पाणी पुढे सरकत नाही. थोडक्यात, पाण्यात तरंग उठणे ही फक्त दगड पडण्याची घटना नसून ऊर्जा, गुरुत्वाकर्षण, द्रवाची घनता, पाण्याची स्थिती आणि निसर्गाचा नियम या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम आहे. यावर सोपा प्रयोग म्हणून घरात पाण्याने भरलेल्या परातीत वेगवेगळ्या आकाराचे खडे टाकून बघा. प्रत्येक वेळी तरंगाचा आकार बदलतो हे लगेच समजेल.

## खरी शिदोरी

एका गावात रघुनाथ आजोबा आणि त्यांची दोन नातवंडे राहत होती. मोठा नातू विराज शहरात शिकायला होता. त्याला नेहमी वाटायचे की पैसाच सगळ्यात मोठा आहे. धाकटा नातू ओंकार मात्र गावातच आजोबांसोबत शेती करायचा. त्याला पुस्तकांपेक्षा आजोबांचे अनुभव जास्त महत्त्वाचे वाटायचे. विराज सुट्टीत गावी आला की ओंकारला चिडवायचा. शेती करून काय मिळणार? चार पुस्तकं शीक, मोठा साहेब हो. ओंकार हसायचा पण काही बोलायचा नाही.

सुरुवातीला विराजचे बरोबर वाटायचे. त्याला इंग्रजी बोलता यायचे, लॅपटॉप चालवता यायचा. पण त्याला साधा बैल बांधता येत नव्हता किंवा विहिरीतून पाणी काढता येत नव्हते. ओंकारकडे डिग्री नव्हती. तो रोज पहाटे उठून गुरे राखायचा, आजोबांसोबत शेतात राबायचा. मग एक दिवस गावात मोठा दुष्काळ पडला. लाईट गेली, मोबाईल बंद पडले आणि शहरातून गावाकडे येणारे रस्ते बंद झाले. विराजचे बँकेतले पैसे होते पण दुकानात धान्यच नव्हते. तो हताशपणे म्हणाला, माझ्याकडे एटीएम कार्ड आहे पण खायला भाकरी नाही. ओंकार मात्र शांत होता. त्याने घराच्या मागे लावलेल्या भाज्या, विहिरीचे पाणी आणि आजोबांनी शिकवलेल्या उपायांनी घर चालवले. त्याच वेळी शेजारच्या आजींचे घर पडायला आले होते. विराज घाबरून उभा राहिला. पण ओंकार क्षणाचाही विचार न करता धावला. त्याने बांबू रोवून, दोरी बांधून आजींना सुखरूप बाहेर काढले. सगळे गावकरी टाळ्या वाजवू लागले.विराजची मान शरमेने खाली गेली. दुष्काळ संपल्यावर तो ओंकारकडे गेला आणि म्हणाला, तुझी शिदोरी खरी आहे दादा. ओंकार फक्त हसला आणि म्हणाला, शिक्षण वाईट नाही, पण फक्त मार्कांसाठी शिकू नकोस. कारण संकटाच्या दिवशी डिग्री कामाला येत नाही, तेव्हा कामाला येतो तो अनुभव आणि माणुसकी. हे ऐकून विराजने ठरवले की आता तो सुट्टीत गावी येऊन शेती शिकेल आणि आजोबांचे ज्ञान घेईल. कारण त्याला कळले होते की दिसण्यासाठी कमावलेली पदवी एक वेळ फसते, पण जगण्यासाठी कमावलेला अनुभव आयुष्यभर साथ देतो.

तात्पर्य : फक्त पुस्तकातले मोठे ज्ञान महत्त्वाचे नाही. खरी शिदोरी तीच जी संकटाच्या वेळी स्वतः ला आणि दुसऱ्याला जगवू शकते.



## आत्मशक्ति

### त्यांचा न्यायनिवाडा

बायबल, नव्या करारानुसार, प्रकाशित वाक्यात अध्यात्मिक मंडळाचे वर्णन आले आहे. मी तेथे प्रवेश केला तेथे एका मोठ्या सफेद सिंहासनाला व त्यावर बसलेल्या (शक्तीला) पाहिले. धरती आणि आकाश त्यापासून दूर पळाले. त्याच्याजवळ त्यांना जागा मिळाली नाही. त्यानंतर त्यांच्यापुढे लहानमोठे मृत लोक त्या सिंहासनापुढे उभे राहिलेले पाहिले. एकामागून एक अशी अनेक पुस्तके उघडली गेली व त्यांच्या केल्या गेलेल्या कार्यानुसार त्यांचा (मेलेल्या लोकांचा) न्यायनिवाडा केला गेला.

(प्रकाशित वाक्य २०.११-१२) यहूदी धर्म ग्रंथ मिशनाह (चळीहपरह) मध्ये लिहिलेले आहे, की

सर्व कांही हिशोबावरून घडते हे लक्षांत घ्या! थडगे ही तुमच्यासाठी लपण्याची जागा आहे, अशीही कल्पना करून घेऊ नका. कारण तुम्ही नाईलाजाने जन्माला आलात, नाईलाजानेच जगत आहात आणि अगदी नाईलाजानेच तुमचा मृत्यु होईल! आणि तशाच परिस्थितीने, म्हणजे नाईलाजानेच तुम्हाला पवित्रतम अशा परमेश्वरांपुढे आपला कर्माचा हिशोब द्यावा लागेल.

(मिशनाह, एबोट ४:२९) यहूदी विधी-संग्रह, 'तालमूद' मध्ये परलोकाचा उल्लेख आला आहे.

ह्यापुढील जग, ह्या संसारासारखे नाही. पुढील जगात खाण्यापिण्याची कटकट नाही, मुलंबाळे नाही, व्यापार-व्यवसाय, शत्रूत्व, घृणा ह्यासारखे काहीही नाही. फक्त सदाचारी तेथे सिंहासन वर बसतात. त्यांच्या मस्तकावर मुकूट असतो आणि त्या दिव्य प्रभुच्या ज्योतीचा ते आनंद घेतात.

मुसलमान लोकही मृत्युनंतरच्या जीवनावर विश्वास ठेवतात. कुराणामध्ये आले की,

तुम्ही हेच जीवन जगू इच्छिता, खरे पहाता पुढे येणारे जीवन उत्तमआणि अधिक टिकाऊ आहे. हे सर्व जुन्या ग्रंथांमध्ये लिहिलेले आहे- अब्राहम आणि मुसाचे ग्रंथ (कुराण ८७.१६-१९)

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### उनकी कृपा

सुरेश ओबेरॉय : मी माझी स्वतःची जी प्रतिमा बनवली आहे ती दुखावली गेली. शिवानीदीदी: हो, तुम्ही ग्रहण केलेली प्रतिमा. जेव्हा आपण अशी प्रतिमा बनवतो तेव्हा आपण देखील त्या प्रतिमेच्या आधारावर लोकांनी आपल्याशी कसं वागल पाहिजे याची कल्पना करतो.

सुरेश ओबेरॉय : हो, तुम्ही अगदी बरोबर सांगितलं.

शिवानीदीदी : जेव्हा लोक त्या ठरावीक पद्धतीने बोलत नाहीत तेव्हा आपण दुखावले जातो. त्या प्रतिमेमुळे आपण असा विचार करतो की लोकांनी आपला आदर केला पाहिजे, आपलं कौतुक केलं पाहिजे आणि कुटुंबानेही आपल्यावर प्रेम केलं पाहिजे. त्यामुळे आपण इतरांकडून काही मिळवण्याच्या स्थितीत जातो.

सुरेश ओबेरॉय : मिळवण्याच्या स्थितीत ?

शिवानीदीदी : ह्या स्थितीमध्ये आपण, मला प्रेम द्या, मला मान द्या, असं म्हणतो. त्या परिस्थितीमध्ये तुम्ही तुमच्या ज्ञानाचा वापर केला आणि घेण्याच्या स्थितीतून देण्याच्या स्थितीत गेलात. तुम्ही असं ठरवलंत की तुम्हाला त्या व्यक्तीकडून आदर मिळण्याची गरज नाही आणि त्याऐवजी तुम्ही त्यांच्याकडे प्रेमाचे आणि आदराचे तरंग पाठवले. हा बदल करताना सर्वांत आधी कोणाला चांगलं वाटलं?

सुरेश ओबेरॉय : मला असं वाटलं की मी एखाद्या गोष्टीवर विजय मिळवला आहे. शिवानीदीदी : तुम्हाला ताकद मिळाली. तुम्ही कोणाला हरवलंत ? यालाच आपण मन जिंकलं तर जग जिंकलं, असं म्हणतो. जो आपल्या मनावर राज्य करतो तो जगावर राज्य करतो. इथे मनावर राज्य करणं म्हणजे मनाने विरुद्ध विचार करूनही तुम्ही तुमच्या अहंकारावर विजय मिळवलात. याचा परिणाम म्हणजे तुम्ही त्या परिस्थितीतही विजेते होता. याउलट जर त्या परिस्थितीत तुम्ही तुमच्या मनाबरोबरचं युद्ध हरला असता तर; जसं, तुम्ही असा विचार केला असता - व्यक्ती माझ्याशी बोलली नाही तर मीही त्या व्यक्तीशी बोलणार नाही - तर तुम्ही हरला असता. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे तुम्ही घेण्याच्या स्थितीतून देण्याच्या स्थितीत गेलात म्हणून तुम्हाला चांगलं वाटलं. आणि याचा परिणाम म्हणून त्या व्यक्तीने तुमची नक्कल केली.

सुरेश ओबेरॉय : बरोबर. त्यांनी सुरुवातीला कमी प्रतिसाद दिला त्याची अनेक कारणं असू शकतात. कदाचित ते दुसऱ्या विचारांत असतील किंवा मी आतापर्यंत

काम केलेल्या चित्रपटांतील भूमिकांमुळे त्यांनी माझी वेगळी प्रतिमा निर्माण केलेली असेल किंवा त्यांना माझ्याबद्दल काही वेगळी माहिती मिळाली असेल. शिवानीदीदी : हो, ही समज आपल्यात नंतर येते. या चिंतनशैलीमुळे परस्पर समज - आपण दुसऱ्या व्यक्तीचा दृष्टिकोनही जाणून घ्यायचा आणि करुणा निर्माण होते प्रयत्न करतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

जावई : सासूबाई, तुमच्या मुलीला जेवण बनवता येत नाही हो.

सासू : मग काय झालं? माझ्या मुलीला नवरा पण मिळालाच की! माझ्या वेळी पण तुमच्या सासऱ्याला हेच वाटायचं. आता बघा, ३० वर्षे सुखाने खातायेत ते

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ एका वर्षात किती आठवडे असतात?

– ५२ आठवडे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### आरोग्य सुधारण्यासाठी

७) डोळ्यांचे विकार, तसेच रातआंधळेपणा या विकारावर पुदिन्याचा वापर नियमित करावा. यामध्ये असणाऱ्या अ जीवनसत्त्वामुळे डोळ्यांचे विकार कमी होतात.

८) त्वचाविकारांवर पुदिन्याचा रस अत्यंत गुणकारी आहे. खरूज, नायटा या विकारांवर पुदिन्याचा रस त्वचेवर चोळावा, तसेच एक-एक चमचा पुदिना रस सकाळ-संध्याकाळ घ्यावा.

९) मुखदुर्गंधी नाहीशी करण्यासाठी, तसेच हिरड्या बळकट करून दंतक्षय थांबविण्यासाठी पुदिन्याची ताजी चार-पाच पाने रोज सकाळी चावावीत. यामुळे दात किडत नाहीत, तसेच जिभेवरील पांढरा थर कमी होऊन तोंड स्वच्छ व सुगंधी राहते.

१०) चेहऱ्यावर मुरुमे, पुटकुळ्या, पांढरे डाग व चेहऱ्याची त्वचा कोरडी झाली असेल, तर हे विकार कमी करण्यासाठी पुदिन्याचा रस, लोणी (ताजे) व मध एकत्र करून चेहऱ्याला मालीश करावे.

११) बाळंतिणीला जर अतिरिक्त दुधाचा त्रास होत असेल, तर दूध कमी करण्यासाठी तिच्या आहारात पुदिन्याचा वापर करावा. पुदिन्यामुळे काही प्रमाणात दुधाचे शोषण होते.

१२) आरोग्य चांगले राखण्यासाठी घरातील गृहिणीने पुदिन्यापासून बनविलेले वेगवेगळे पदार्थ कल्पकतेने स्वयंपाकघरात वापरावेत. भाजी, आमटी करताना, तसेच रुचकर चटणी करताना पुदिन्याचा वापर जरूर करावा. त्यामुळे भोजनाचा स्वाद वाढतो व घेतलेले भोजन व्यवस्थित पचते. तसेच त्याच्या औषधी गुणधर्मामुळे आरोग्य चांगले राहते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# समर्पण चातुर्मास या पावन पर्वामध्ये सहभागी होऊन भाविकांनी श्रद्धेने व समर्पण भावनेने गुरुंशी लीन व्हावे

## तिर्थेशऋषीजी म.सा. यांचे निरुपण; बडीसाजन मंगल कार्यालय येथे ३० जूनपर्यंत शिबीर


बडीसाजन मंगल कार्यालय येथे तीर्थेशऋषीजी म.सा.यांनी धर्म प्रभावाना करताना समाजाचे प्रबोधन केले. याप्रसंगी चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष बाबुशेठ बोरा, विलास कटारिया, अभिजीत गांधी, विनोद कटारिया तसेच सपना कटारिया, मीना पितळे, योगिता चंगेडिया, स्वाती कटारिया, मिना पितळे, पुनम बोरा, दिप्ती मुथा आदींसह भाविक उपस्थित होते.

नगर – जगातील पशु, मनुष्य, देवता या सर्व जीवांना तीर्थ करायचे हा संकल्प महावीर स्वामींनी केला म्हणून त्यांना तीर्थंकर म्हणले जाते. मानवी भाषेत स्थापना करणाऱ्याला संस्थापक म्हणतात. परंतु महावीर स्वामींना तिर्थंकर म्हणले आहे. एकदा तीर्थ बनले तर ते जगासाठी पूजनीय होतात. तीर्थाच्या पाच अवस्था अनर्थ, व्यर्थ, सार्थ, अर्थ आणि तीर्थ या आहेत. जो व्यक्ती तीर्थ आहे तो अनर्थ आणि व्यर्थ यापासून मुक्ती मिळवतो. तीर्थापेक्षा मोठी उपमा आपल्या जीवनात नाही. महावीर स्वामींचा संदेश स्वीकार करावा. त्यावेळेस आपल्या जीवनाचे तीर्थ होईल. हाच संदेश घेऊन उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. अहिल्यानगर येथे आले आहे. ही धर्मा यात्रा राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा.यांना समर्पित करावी. २००९ साली उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. यांचा चातुर्मास झाला होता. तब्बल सोळा वर्षानंतर २९ जुलै रोजी होणारा शिखर चातुर्मास हा समर्पण चातुर्मास या नावाने होणार असल्याने सर्व आनंद भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. समर्पण चातुर्मासया पावन पर्वा मध्ये सहभागी होऊन भाविकांनी श्रद्धेने व समर्पण भावनेने गुरुंशी लीन व्हावे, असे निरुपण तिर्थेशऋषीजी म.सा.यांनी केले आहे.

बडीसाजन मंगल कार्यालय येथे तीर्थेशऋषीजी म.सा.यांनी धर्म प्रभावाना करताना समाजाचे प्रबोधन केले. याप्रसंगी चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष बाबुशेठ बोरा, विलास कटारिया, अभिजीत गांधी, विनोद कटारिया तसेच सपना कटारिया, मीना पितळे, योगिता चंगेडिया, स्वाती कटारिया, मिना पितळे, पुनम बोरा, दिप्ती मुथा आदींसह भाविक उपस्थित होते.

तिर्थेशऋषीजी म.सा.यांनी पुढे बोलताना सांगितले की, महावीर स्वामी यांच्या आगमनाने चंडकोषी नावाच्या सर्पाचे तीर्थ झाले. महावीर स्वामींचे दर्शन केल्याने चंडकोषी सर्पाचे तिर्थंकर गोत्र झाले.

पहावा आनंद ऐकावा आनंद बोलावा आनंद श्वासा श्वासात, आनंदाचे डोही आनंद तरंग मायबाप माझे आनंद माऊली, हृदय आनंद जीवनी आनंद वाहावा आनंद श्वासा श्वासात या कवितेत सांगितले प्रमाणे गुरुकृपा होण्यासाठी गुरूंना पाहायचे आहे.बोलायचे आहे. समजायचे आहे. गुरूंना अनुभवायचे आहे. गुरूंच्या चरणी चंदन होऊन लीन व्हावे. अशी उपमा कवीने दिली आहे. चंदनाच्या झाडाचे वैशिष्ट्य म्हणजे चंदनाच्या झाडाला साप लपटलेले असतात. दोन्हीही विरुद्ध गुण असलेले आहेत. चंदन सापाला येण्यासाठी नकार देत नाही परंतु मी चांगलेच गुण घेऊ शकतो परंतु तुझे वाईट गुण घेणार नाही. चंदन थंडपणा देते. पण सापाचे विष घेत नाही. चंदना प्रमाणेच मानवाने जीवनात चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा. हा संदेश भगवंत महावीर स्वामींनी दिला आहे.

बाबूशेठ बोरा म्हणाले, बडी साजन मंगल कार्यालय येथे २८, २९, ३० जून या कालावधीत तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष प्रेमराज बोथरा, उपाध्यक्ष अजित कर्नावट, सेक्रेटरी विशाल शेटिया तसेच सर्व पदाधिकारी यांनी मंगल कार्यालय निःशुल्क उपलब्ध करून दिले आहे. या विशेष सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## पोकळ पांडित्य

संकलन: दिशान फिचर्स




सुटला सगळ्यांशी वाद घालीत. चालला जिकडे तिकडे भाषणे ठोकीत. तारस्वरात आपली आग्रही मते सांगत. त्याच्या केवळ आवेशानेच लोक झाले प्रभावित. मग तो म्हणतो, म्हणा मला पंडित. वादविवादात मी सगळ्यांना आलोय हरवीत, त्याला ना लाज ना भीती. हेच त्याच्या पांडित्याचे इंगित. नीलकंठ दीक्षित नावाचा संस्कृत कवी पंडिताबद्दल हे सांगतो.

भिऊ नका. कोणाचेही ऐकू नका. कुणालाही समजून घेऊ नका. धडाधड विधाने करीत चला. क्षणभरही न थांबता संततधार बोला. मग सभेत विजय मिळेल. विषयाचा अभ्यास नाही? तर भीतीचे कारण नाही. लाजेचे तर नावच नाही. लाज सोडा, पांडित्य पदरात पाडा. त्यासाठी वरच्या आवाजात भाषणे झोडा. सगळे सौजन्याचे नियम तोडा. वाटेल त्या प्रकारे दुसऱ्याची मते खोडा, पण पांडित्याशी नाते जोडा.

ज्ञान नाही, शास्त्राचा आधार नाही, पुराणाचेही भान नाही, साधार बोलावे हे ज्यांना ठाउकच नाही, त्यांचे थोबाड कधी पाहू नये, नुसता तर्ककुतर्क उठवतो, त्यात काहीही अर्थ नसतो. लोकांना काय कळतं, असं तो समजतो आणि चळ लागल्यागत बोलत सुटतो. त्याला हा उन्मादच चढलेला असतो. वात झाल्यासारखा बडबडतो. तशाची संगत नको, नको!

नुसते शब्दांचे बुडबुडे त्यांच्या पांडित्यातून उडणार. ज्ञानात काहीही भर न पडणार. पदोपदी अर्थ आहे. तरी छळावया इतरा न भीती. मनातल्या मनात सज्जन शहाण्यावर जळती, मनात कुढती. कुठल्याही चांगल्या गोष्टीवर त्यांची श्रद्धाच नाही. ते जाणूनबुजून त्रास देण्याच्या उद्देशानेच येतात. तुकाराम महाराज म्हणतात, अशांची चांगली हजामत केली पाहिजे. त्यांची भीड धरू नये.

एक होता देवदत्त स्वतःला फार पंडित समजाचयचा. आपल्याइतका चुरचुरीत व विनोद भाषण करणारा जन्मलाच नाही, अशा समजुतीनं वावरायचा. ज्ञान जुजबी माहिती काढण्याचे श्रम घ्यायचे कुणी?

एकदा एका सभेत थोर साहित्यिकाचा परिचय करून द्यायला तो उभा राहिला. त्याला त्या साहित्यिकाच्या कलाकृतींची नावेदेखील ठाऊक नव्हती. पण त्याला त्याची काही काळजी वाटत नव्हती. त्यानं कादंबऱ्या किती लिहिल्या, हे तरी त्याला कुठे माहिती ? कोणत्या साहित्य प्रकारांत त्या थोर साहित्यिकाने किती ग्रंथ लिहिले, ते तरी त्याने मोजले ? मग तो सुटला बडबडत.

यांनी बरंच लिहिलं आहे. बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या, बरीच नाटकं लिहिली, बऱ्याच लघुकथा लिहिल्या, बरंच संशोधन केलं. बरंच साहित्य निर्माण केलं. तेव्हा काय बोलावं? यांचं सगळं बरंच बरं आहे.

श्रोते हसले. थोर साहित्यिक रागावले. संयोजक संतापले. देवदत्ताचा खांदा धरून त्यांनी त्याला खाली बसविले.

– किशोर गांधी

# नगरमध्ये ३० जून रोजी पहिल्यांदाच 'बीडेड टँक टॉप' कार्यशाळेचे आयोजन

## इंदौर येथील प्रशिक्षकांकडून मण्यांच्या नक्षीकामाची (बीडेड एम्ब्रॉयडरी) कला शिकवली जाणार



नगर – फॅशनच्या जगात टँक टॉप्स आणि कपड्यांवरील मण्यांचे नक्षीकाम (बीडेड एम्ब्रॉयडरी) पुन्हा एकदा लोकप्रिय होत आहे. नक्षीकामाची ही जुनी शैली आधुनिकतेची जोड देऊन सादर केली जात असल्याने आजच्या तरुणाईमध्ये तिला विशेष पसंती मिळत आहे. या कलेवर आधारित कार्यशाळा अहिल्यानगरमध्ये पहिल्यांदाच आयोजित केली जात आहे. ही कार्यशाळा इंदौर येथील तरुण उद्योजिका व एमबीएची विद्यार्थिनी रिमझिम खंडेलवाल आणि अहिल्यानगर येथील आयुषी खंडेलवाल यांच्याद्वारे घेतली जाईल.

रिमझिम आणि आयुषी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कार्यशाळा ३० जून रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत 'कॅफे ला फेव्हरेट ल्यू' (Cafe La Favorite Lieu), सावडी येथे होणार आहे. यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी आणि महिलांना टँक टॉप्स, टी–शर्ट्स आणि आवश्यक असलेले सर्व साहित्य पुरवले जाईल.

या कार्यशाळेदरम्यान, सहभागींना साध्या टी–शर्ट्स आणि टॉप्सवर मण्यांचे नक्षीकाम करून त्यांना एक नवीन आणि आकर्षक लूक कसा द्यायचा, हे शिकवले जाईल.

अहिल्यानगरमध्ये अशा प्रकारची कार्यशाळा पहिल्यांदाच होत असल्याने, इच्छुक विद्यार्थी आणि महिला ९९६०५९७७७१ या क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करू शकतात.

# पुण्याच्या सायकलिंग प्रशिक्षक दिपाली बारगुजे यांची दक्षिण कोरियातील युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल लेव्हल वन टू कोचिंग कोर्ससाठी निवड



पुणे – पुण्याच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकलिंग प्रशिक्षक दिपाली बारगुजे यांची दक्षिण कोरियामध्ये २९ जून ते १३ जुलै या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल लेव्हल टू कोचिंग कोर्स साठी निवड झाली आहे. या अभ्यासक्रमासाठी जगभरातील निवडक प्रशिक्षकांची निवड केली जाते. भारतातून झालेली त्यांची निवड ही महाराष्ट्रासह देशासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

दिपाली बारगुजे यांनी २००७ ते २०१७ या कालावधीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सायकलपटू म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च क्रीडा सन्मान शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारत्यांना प्रदान करण्यात आला.

खेळाडू म्हणून यशस्वी कारकीर्दीनंतर त्यांनी २०१७ पासून सायकलिंग प्रशिक्षक म्हणून कार्य सुरू केले. प्रशिक्षक म्हणून स्वतःला अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट कोचिंग डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.

सध्या त्या महाराष्ट्र शासनाच्या खेलो इंडिया स्टेट सेंटर ऑफ एक्सलन्स, शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे असिस्टंट कोच सायकलिंग म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रशिक्षक म्हणून कार्य करत असतानाच दिपाली बारगुजे यांनी सायकलिंग स्पर्धांच्या तांत्रिक व्यवस्थापनातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या पुणे ग्रँड टूर सायकलिंग स्पर्धेत त्यांनी ऊेाल्मीरळीश (पंच) म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. त्यामुळे खेळाडू, प्रशिक्षक आणि तांत्रिक अधिकारी अशा तिन्ही भूमिकांमध्ये त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दक्षिण कोरियात होणाऱ्या युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल लेव्हल टू कोचिंग कोर्समध्ये आधुनिक प्रशिक्षण पद्धती, क्रीडा विज्ञान, खेळाडू विकास, प्रशिक्षण नियोजन, ट्रॅक व रोड सायकलिंगमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कोचिंग कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. विक्रम रोठे, उपाध्यक्ष अविनाश कदम, धनंजय वानखेडे, विजय जाधव, खजिनदार भिकन अंबे, प्रा. साईनाथ थोरात, अभिजीत मोहिते, प्रविण पाटील (सीईओ सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया), महाराष्ट्र सायकलिंग फेडरेशनचे सचिव प्रा.संजय साठे यांनी दिपाली बारगुजे यांचे अभिनंदन केले.

# जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ४ जुलै रोजी मोफत कॅन्सर तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ४ जुलै रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. वेळीच निदान व योग्य उपचार घेतल्यास कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकतो. यासाठीच या शिबिराच्या माध्यमातून कॅन्सर रूग्णांना दिलासा देण्यात येणार आहे.

या शिबिरात तोंडाचा कॅन्सर, घसा व अन्ननलिकेचा कॅन्सर, फुफ्फुसाचा कॅन्सर, मूत्राशयाचा कॅन्सर, मूत्रपिंडाचा कॅन्सर, प्रोस्टेट कॅन्सर, हाडांचा कॅन्सर, गर्भाशयाचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर, अंडाशयाचा कॅन्सर, मोठ्या आतड्याचा गुदाशयाचा कॅन्सर, लहान मुलांचा कॅन्सर, ब्लड कॅन्सर तपासणी केली जाईल. कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन डॉ. तुषार मुळे, बालरोग रक्तविकार तज्ज्ञ डॉ.लिझा बलसारा, फिजिशियन डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.स्वप्निल शिंदे, डॉ. प्राजक्ता पारधे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.कृतिका पाटील, डॉ.निलोफर धानोरकर, रेडिओलॉजीस्ट डॉ.मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखिता जैन–कटारिया, डॉ. हेमा सुराणा, मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ. नरेंद्र पाटील, पॅथोलॉजीस्ट डॉ.मुकुंद उंडे, डॉ.सरिता झरेकर, डॉ. जिज्ञासा मुनोत रूग्ण तपासणी करणार आहेत.

या हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान व जागतिक दर्जाची उपकरणे असून तज्ज्ञ डॉक्टरांची टिम कार्यरत आहे. हॉस्पिटलमध्ये ६ अद्ययावत मॉड्युलर ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. मानसिक समुपदेशन व आधार, रेडिएशन उपचारावर समुपदेशन व सल्ला उपलब्ध आहे. मॅमोग्राफी, एमआरआय, सिटी स्कॅन, सोनोग्राफी, पॅथोलॉजीच्या सर्व तपासण्या एकाच छताखाली असून केमोथेरपी डे केअरची सुविधा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सर्व प्रकारच्या सर्जरी व केमोथेरपी मोफत केली जाईल. सर्व उपचार अत्यल्प दरात करण्यात येतील.

आनंदऋषीजी हॉस्पिटल अहिल्यानगर जिल्ह्यातील २६० बेडचे एकमेव एनएबीएच मान्यताप्राप्त हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये एमआरआय २५०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, मॅमोग्राफी १०० रुपये, सोनोग्राफी ८०० रुपयात केली जाते. २४ तास रूग्णवाहिका व मेडिकल सुविधाही उपलब्ध आहे. कॅन्सर तपासणी शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४१–२३२०४७४/७५/७६.

# 'स्वरोहम संगीत अकादमी'च्या विद्यार्थ्यांचे अखिल भारतीय गांधर्व परीक्षेत घवघवीत यश




नगर – अहिल्यानगर येथील स्वरोहम संगीत अकादमी गेल्या ८ वर्षांपासून संगीत क्षेत्रात कार्यरत असून संस्थेतील विद्यार्थी दरवर्षी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या विविध संगीत परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश मिळविले आहे. या वर्षी अकादमीच्या तबला व हार्मोनियम विभागातील चार विद्यार्थ्यांनी केंद्रात प्रथम क्रमांक पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

केंद्रात प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे : आराध्या गाडळकर – हार्मोनियम प्रारंभिक परीक्षा – केंद्रात प्रथम., वेदिका लोंढे – हार्मोनियम प्रवेशिका प्रथम परीक्षा – केंद्रात प्रथम., कौस्तुभ कोकाटे – तबला प्रारंभिक परीक्षा – केंद्रात प्रथम., वरद कुलकर्णी – तबला मध्यमा प्रथम परीक्षा – केंद्रात प्रथम

तसेच विशेष योग्यता श्रेणी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रद्धा पालवे, सई लोंढे, सहस्रा मधुर आणि अथर्व भालगीकर यांचा समावेश आहे.

प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : मोनल भंडारी, शुभंकर डावभट, कैवल्य कोकाटे, राजवर्धन गडाख, तनुष व्यापारी आणि सात्यकी तांदळे. तर द्वितीय श्रेणी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये राजवीर पिंपरकर, शौनक जोशी आणि प्रियांशु वाघमारे यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना सौ. अमृता बेडेकर व सार्थक डावरे यांचे मार्गदर्शन लाभले.


भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते गोविंद गायकवाड यांना भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

# भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी गोविंद गायकवाड



नगर – भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी गोविंद शिवाजीराव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा सरचिटणीस निखिल वारे, नगरसेवक करण कराळे, महेश लोंढे, सुजय मोहिते, युवा मोर्चाचे सरचिटणीस कैलास गर्जे, उपाध्यक्ष सोमनाथ जाधव, सचिव सुयश नरसाळे, विजय भालेकर आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील, युवा मोर्चाचे प्रदेश प्रभारी सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. ऋद्रेश अंबाडे यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

गोविंद गायकवाड यांनी पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी युवकांना मोठ्या प्रमाणात भाजपशी जोडण्याचे काम करणार आहे. शासनाच्या विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, सामाजिक उपक्रम राबविणे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणे आणि भाजप सरकारच्या माध्यमातून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भारतीय जनता पार्टीने पिढी बदलल्याने पक्षाला मोठे यश मिळाले

## आमदार सुनील कर्जतकर यांचे प्रतिपादन; पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार


रंगारगल्ली येथे पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान, पंडित दीनदयाळ पतसंस्था व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्यपदी निवड झाल्याने आमदार सुनील कर्जतकर यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – पंडित दीनदयाळ परिवाराचा हा सत्कार म्हणजे एक कौटुंबिक स्नेह मेळावाच आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जनता पार्टीचे संघटनाचे कार्य केले आहे. या जिल्ह्यामध्ये सूर्यभान वहाडणे यांच्यासारखे नेते होऊन गेले आहेत. ज्यांच्यावर एक सुद्धा डाग दिसत नाही. तसेच राजाभाऊ झरकर, माणिकराव पाटील, गोंदकर, खटोड यांच्या सारखे असंख्य कार्यकर्त्यांची खाण म्हणजे नगर जिल्हा आहे. जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत पार्टीचे काम करत असताना जामखेड या तालुक्याने पार्टीला पहिले जिल्हा परिषद सदस्य साहेबराव इंगळे, पहिले आमदार सदाशिव लोखंडे, मार्केट कमिटी पहिल्यांदा जिंकली. या गोष्टींचा मनस्वी आनंद आहे. सध्याच्या काळात भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. केंद्रात व राज्यात पार्टीची सत्ता आहे. तसेच २२ राज्यात भाजप सत्तेवर आहे. भारतीय जनता पार्टीने पिढी बदलल्याने पक्षाला मोठे यश मिळाले आहे, असे प्रतिपादन विधान परिषद सदस्य आमदार सुनील कर्जतकर यांनी केले आहे.

रंगारगल्ली येथे पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान, पंडित दीनदयाळ पतसंस्था व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्यपदी निवड झाल्याने आमदार सुनील कर्जतकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा, अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, अभय आगरकर, अनिरुद्ध देवचक्के, भानुदास बेरड, सदाशिव देवगांवकर, सुनील रामदासी, सी.ए.ज्ञानेश्वर काळे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, पंडित वाघमारे, जिल्हा सरचिटणीस नितीन कापसे (राहता), माजी तालुकाध्यक्ष बबनराव मुठे, संगमनेरचे माजी नगरसेवक गिरीश मुळे, नगरसेवक ज्ञानेश्वर कर्पे, राहुरीचे माजी अध्यक्ष राजेंद्र दरक, प्रकाश पारख, पारनेरचे बबनराव डावखर, विलास नंदी, राजेंद्र वाडेकर, बाबासाहेब साठे, अनिल सबलोक, अनिल गट्टानी, चेतन जग्गी, ॲड. राजेंद्र सेलोत, उद्योजक संजय चव्हाण, पोपट लोढा, संजय वल्लाकट्टी, महावीर कांकरिया, सोमनाथ चिंतामणी, संग्राम म्हस्के, पारस लोढा, ॲड. अच्युत पिंगळे, ॲड. देवेंद्र बंब, कैलास दळवी, अनिल निकम, ज्ञानेश्वर भांगे, मयूर बोचुघोळ, उदय अनुभुले, किशोर रायमोकर, निलेश लोढा, कालिंदी केसकर, उज्वला भांगे, सुरेखा जंगम, लीलावती अग्रवाल आदीं उपस्थित होते.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, नगर जिल्ह्यात १९९५ साली प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जनता पार्टीला सर्वदूर पोचविण्याचे कार्य सुनील कर्जतकर यांनी केले आहे. जिल्ह्यात संघटनाच्या कामाची चांगल्या प्रकारे उभारणी केल्याने नगरपालिका व जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकांमध्ये भाजपाने यश मिळविले आहे. त्यांचे काम स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या निदर्शनास आल्याने त्यांना मुंबई येथे बोलावून संघटन मंत्री केले. यानंतर सुनील कर्जतकर यांनी संघटन कौशल्य दाखविले. ज्यावेळेस विधान परिषदेची यादी जाहीर झाली. त्यावेळेस सुनील कर्जतकर यांचे नाव आघाडीवर होते. ते आमदार झाले तेव्हा भाजप कार्यकर्त्यांमध्ये अशी भावना होती की मीच आमदार झालो आहे. पंडित दीनदयाळ परिवाराचेवतीने गेल्या १० वर्षापासून व्याख्यानमाला सुरू आहे. तसेच विविध उपक्रम राबविण्यात येतात. आपण आमदार झाल्याने अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील विकासकामे मार्गी लागतील. यासाठी प्रयत्न करावेत. सूत्रसंचालन प्रा.सुनील पंडित यांनी केले. धनंजय तागडे यांनी आभार मानले.

# योग विद्याधामतर्फे १ जुलैपासून विविध योग वर्गांना प्रारंभ

नगर – शहरातील योग विद्याधामतर्फे १ जुलैपासून नागरिकांसाठी विविध योग प्रशिक्षण वर्गांना सुरुवात करण्यात येणार आहे. यामध्ये प्राथमिक योगासन वर्ग, योग परिचय वर्ग आणि प्राणायाम वर्ग यांचा समावेश असून सर्व वयोगटातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्याधामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी केले आहे.

हे सर्व वर्ग योग भवन, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूल मागे, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासाचे प्रशिक्षण दिले जाणार असून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी हे वर्ग उपयुक्त ठरणार आहेत.

योगाभ्यासामुळे निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होत असल्याने नागरिकांनी या वर्गांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन वर्गप्रमुख अनिरुद्ध भागवत यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४१–२४२१२५५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# अहिल्यानगर मनपाच्यावतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला प्रारंभ

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला रविवारी शहरभर उत्साहात प्रारंभ झाला. शहरातील महापालिकेच्या सात आरोग्य केंद्रांवर तसेच २२५ पोलिओ बूथ केंद्रांवर शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लसीकरणाचा डोस देण्यासाठी पालकांनी गर्दी केली. महापालिका आरोग्य विभागाने केलेल्या नियोजनबद्ध तयारीमुळे लसीकरण प्रक्रिया सुरळीत पार पडत असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे महापौर ज्योतीताई गाडे व महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप यांच्या हस्ते बालकाला पल्स पोलिओचा डोस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेविका मंगल लोखंडे, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. धनंजय कुलकर्णी, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. दिलीप बागल, योगेश औटी, डॉ. शिल्पा पाठक, डॉ. वृषाली पाटील, डॉ. भाग्यश्री अंभिरे, डॉ. जोशी, डॉ. वृषाली आरु, संगीता दळवी, कविता खिलारी आदींसह पालक उपस्थित होते.

**कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते बालकाला लसीकरणाचा डोस**




कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे महापौर ज्योतीताई गाडे व महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप यांच्या हस्ते बालकाला पल्स पोलिओचा डोस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, पल्स पोलिओचे दोन थेंब हे प्रत्येक बालकाच्या निरोगी, सुदृढ आणि सुरक्षित भविष्यासाठी अत्यंत लाभदायक आहेत. महापालिका आरोग्य विभागाने शहरातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत लसीकरण पोहोचविण्यासाठी व्यापक आणि नियोजनबद्ध तयारी केली असून यंदाचे लसीकरणाचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण केले जाईल. आज ज्या बालकांना काही कारणास्तव लसीकरणाचा डोस मिळू शकला नाही, त्या प्रत्येक बालकाच्या घरी पुढील पाच दिवस आरोग्य विभागाची विशेष पथके जाऊन पल्स पोलिओचा डोस देणार आहेत. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी महापालिका कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची सविस्तर माहिती देत शहरातील लसीकरण नियोजन, बूथ व्यवस्था आणि पुढील पाच दिवसांच्या घरभेट मोहिमेबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. वृषाली आरु यांनी आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवक आणि पालकांचे आभार मानले.

अहिल्यानगर महानगरपालिका तोफखाना आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ नगरसेविका शीतल अजय ढोणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. श्रद्धा ढोणे, भारत ढोणे, डॉ. कांचन रच्चा, डॉ. शुभम गाडे, सचिन गरकर, रोहिणी सानप आदी उपस्थित होते.

उपस्थितांनी पालकांना आपल्या बालकांना नियमित लसीकरणासोबतच पल्स पोलिओचे दोन थेंब देण्याचे आवाहन करत पोलिओमुक्त भारताच्या संकल्पाला बळकटी देण्याचे आवाहन केले

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **सुमैय्या तौसीफ शेख** रा. बंगलो नं. १, गोविंदपुरा झेड.पी.शाळा जवळ, अ.नगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर केला असून, सदर मिळकत कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन आमचे अशिलांकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध,ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, साठेखत,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३४१/३ | १४ | २१०.०० |

सदर प्लॉटवर लोडबेअरीग मध्ये बांधकाम झालेल्या रो–हाऊसिंग स्किम मधील विद्यमान मालक यांचे मालकीचा रो–हौसिंग ब्लॉक नं.७/अ असून याचे प्लॉटचे क्षेत्रफळ ४४.७० चौ.मी. यावरील बांधकाम क्षेत्र २५.३८ चौ.मी. बाकी मागे पुढे खुली जागा यातील इलेक्ट्रीक लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह संपुर्ण मिळकतीबाबत.

**यासी चतुःसिमा**– पुर्वेस – प्लॉट नं. २२, दक्षिणेस – ब्लॉक नं.७/ब
पश्चिमेस – रस्ता, उत्तरेस – ब्लॉक नं.६/ब
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक
काही एक राखुन न ठेविता.
दि.२९/०६/२०२६,
अहमदनगर.

ॲडव्होकेट
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली,
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

# प्रा. रागिनी कदम–टेकाळे यांना हिंदी विषयातील पीएच.डी. पदवी



नगर – देवळाली प्रवरा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात हिंदी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या रागिनी कदम–टेकाळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून हिंदी विषयातील इक्कीसवीं सदी के हिंदी उपन्यास : संवेदना के विविध आयाम या विषयावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

त्यांनी हे संशोधनकार्य न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रातून पूर्ण केले. हे संशोधन कार्य प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ येथील सहयोगी प्राध्यापक व हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. संशोधन प्रक्रियेदरम्यान संशोधन केंद्रप्रमुख डॉ. हनुमंत जगताप, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. सुनीता मोटे तसेच राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती हापसे आणि महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, संस्थेचे पदाधिकारी, मनोज कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच देवळाली प्रवरा शहर परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कुंडीतील वडाच्या झाडाची १२ वर्षांपासून अखंड पूजा

**पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वटपौर्णिमा उत्साहात साजरी; कुंभार गल्लीतील महिलांचा अनोखा उपक्रम**



नगर – वटपौर्णिमा हा सुवासिनींच्या श्रद्धा, परंपरा आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानला जाणारा सण शहरासह जिल्हाभर उत्साहात साजरा करण्यात आला. वडाच्या झाडाची विधीवत पूजा करून सात प्रदक्षिणा घालत पतीच्या दीर्घायुष्याची व अखंड सौभाग्याची प्रार्थना महिलांनी केली. शहरातील विविध भागांमध्ये वडाच्या झाडांजवळ महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मात्र, चितळे रोड परिसरातील कुंभार गल्ली येथील महिलांनी गेल्या बारा वर्षांपासून जपलेली एक वेगळी परंपरा यंदाही सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

कुंभार गल्लीतील महिलांनी तब्बल १२ वर्षांपूर्वी एक अभिनव निर्णय घेत आपल्या गल्लीतच एका कुंडीत वडाचे रोप लावले. परिसरात मोठे वडाचे झाड उपलब्ध नसल्याने आणि लांब अंतरावर जाऊन पूजा करण्याची अडचण लक्षात घेऊन, आपल्याच परिसरात वडाचे झाड वाढवू आणि त्याचीच पूजा करू, असा संकल्प त्यांनी केला. त्यानुसार लावलेल्या त्या रोपाची आजही अत्यंत प्रेमाने व श्रद्धेने देखभाल केली जात असून, प्रत्येक वर्षी वटपौर्णिमेला त्याच झाडाची विधीवत पूजा केली जाते.

यंदाही पहाटेपासूनच महिलांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्र येत कुंडीतील वडाच्या झाडाची पूजा केली. झाडाला हळद–कुंकू वाहून, फुले अर्पण करून धागा बांधत सात प्रदक्षिणा घालण्यात आल्या. अखंड सौभाग्य, कुटुंबाचे आरोग्य, सुख–समृद्धी आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिलांनी प्रार्थना केली.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे धार्मिक परंपरेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला जात आहे. केवळ पूजा करण्यापुरते झाड न पाहता त्याचे संवर्धन आणि संगोपन करण्याची जबाबदारीही महिलांनी स्वीकारली आहे. गेली बारा वर्षे त्या झाडाची नियमित काळजी घेतली जात असून, ते अधिक वाढल्यानंतर त्याचे कायमस्वरूपी वृक्षारोपण याच गल्लीत करण्याचा महिलांचा मानस आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **प्रविण नाबोथ त्रिभुवन व रुबेन भाऊराव त्रिभुवन दोघे रा. सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असून सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणून दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**– डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ३७/२/१ब मधील प्लॉट नं. ४६ याचे प्लॉटचे एकूण क्षेत्र २८०.०० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील आर.सी.सी स्ट्रक्चरमधील तळमजल्याचे बांधकाम क्षेत्र ९७.०२ चौ. मी. ही संपूर्ण मिळकत.

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :–**
पुर्वेस : ९ मी.रस्ता, दक्षिणेस : ओपन स्पेस,
पश्चिमेस ओपन स्पेस, उत्तरेस प्लॉट नं. ४५,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणूक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर, दिनांक :– २९/०६/२०२६

**ॲड.सुनिल गोरक्षनाथ हरिश्चंद्रे,**
**ॲड.ओंकार पंडित मोरे**
मो : ९८६०६४६४६३, ऑफिस : गाळा नं.४,
महालक्ष्मी चेंबर्स,पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

# AHMEDNAGAR MERCHANT'S CO-OP. BANK LTD., (Scheduled Bank), AHILYANAGAR

**Annexure I Form A**

**Balance Sheet as on 31st March, 2026** (Amounts in ₹ lakh )

| Particular | Schedule No. | As on March 31, (2026) | As on March 31, (2025) |
|---|---|---|---|
| Capital and Liabilities | | | |
| Capital | 1 | 2,120.53 | 1,921.96 |
| Reserves and surplus | 2 | 29,275.31 | 27,883.55 |
| Deposits | 3 | 1,62,231.65 | 1,46,215.72 |
| Borrowings | 4 | - | - |
| Other liabilities and provisions | 5 | 2,952.27 | 3,339.11 |
| **Total** | | **1,96,579.77** | **1,79,360.34** |
| **Assets** | | | |
| Cash and balances with Reserve Bank of India | 6 | 14,629.83 | 15,909.05 |
| Balances with banks and money at call and short Notice | 7 | 27,241.34 | 27,097.48 |
| Investments | 8 | 43,033.60 | 32,737.13 |
| Advances | 9 | 1,04,911.35 | 96,838.91 |
| Property, plant and equipment | 10 | 4,145.17 | 4,400.59 |
| Intangible assets | 11 | - | - |
| Other assets | 12 | 2,618.48 | 2,377.17 |
| **Total** | | **1,96,579.77** | **1,79,360.34** |
| Contingent liabilities | 13 | 1,383.61 | 1,278.11 |
| Bills for collection | | 0.20 | 0.20 |
| Interest Receivable on NPA | | 7,376.28 | 8,436.32 |
| Penal Charges receivable on NPA | | 166.33 | - |

**Form B**

**Form of Profit and Loss Account for the year ended on 31st March. 2026** (Amounts in ₹ lakh )

| Particular | Schedule No. | As on March 31, (2026) | As on March 31, (2025) |
|---|---|---|---|
| Interest and discount earned | 14 | 16,104.64 | 16,437.00 |
| Interest expenses | 15 | 8,743.24 | 7,741.92 |
| Net Interest Income | | 7,361.40 | 8,695.08 |
| Fee and commission income | | 418.22 | 411.71 |
| Fee and commission expense | | 324.88 | 214.75 |
| Net fee and commission income | | 93.34 | 196.96 |
| Other income from investments | 16 | 466.29 | 285.86 |
| Other income | 17 | 274.46 | 147.48 |
| Total income | | 8,195.49 | 9,325.38 |
| Employee benefits | 18 | 1,468.62 | 1,415.54 |
| Provision for non-performing assets | 19 | 1,090.66 | 2,312.99 |
| Provision for Investment Depreciation Reserve | | 34.00 | - |
| Depreciation on property, plant and equipment and amortization of intangible assets | | 139.28 | 139.99 |
| Other expenses | 20 | 4,143.00 | 3,865.25 |
| Total expenses | | 6,875.56 | 7,733.77 |
| Net profit/loss before taxes | | 1,319.94 | 1,591.61 |
| Tax expense: | | - | - |
| Current tax | | 575.68 | 888.75 |
| Deferred tax | | - | - |
| Net Profit (+)/ Loss (-) for the period | | 744.26 | 702.86 |
| Appropriations | | | |
| i. Transfer to Statutory Reserves | | - | - |
| ii. Proposed dividend | | - | - |
| iii. Other appropriations (to be specified) | | - | - |
| iv. Balance carried over to balance sheet | | - | - |

**For Ahmednagar Merchant's Co-op. Bank Ltd., (Scheduled Bank), Ahilyanagar**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**(M/s. R R GUJARATHI & CO.)**
**Chartered Accountant's**
**FRN Reg.No. : 103382W**

**CA ROHIT BAFNA**
**Partner -**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**

**UDIN : 26113955TSZWJI9149**

**Nitin Bhandari** Jt. C.E.O.
**Sunil Puranik** C.E.O.
**Amit Mutha** Vice Chairman
**Hastimal Munot** Chairman

**-------- Board of Director--------**

| | | |
|---|---|---|
| Anil Pokharna | Kamlesh Bhandari | Anandram Munot |
| Sanjay Bora | Kishor Gandhi | CA IP Ajay Mutha |
| CA Mohan Barmecha | Sanjay Chopda | Kishor Munot |
| Sanjeev Gandhi | Subhash Bayad | Smt. Pramila Bora |
| Smt. Meena Munot | Vijay Kothimbire | Subhash Bhand |
| Jitendra Bora ------------Staff Director -------------- | | Prasad Gandhi |

## P A R A M & ASSOCIATES
## (Formerly Known as M/s. R R GUJARATHI & CO.)
## Chartered Accountants

33, JITO Business Bay, Near Mumbai Naka, Nashik - 422002
Tel Phone - 0253-2572218/4065317 Email :- paramandassociate@gmail.com

**INDEPENDENT AUDITOR'S REPORT**

**Report on the Financial Statements-** 1. We have audited the accompanying financial statements of Ahmednagar Merchants Co-op Bank Ltd, (Scheduled Bank) Ahilyanagar, which comprise the Balance Sheet as at **31st March 2026** and the Profit and Loss Account, and the Cash Flow Statement for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of 18 branches audited by us are incorporated in these financial statements. **Management's Responsibility for the Financial Statements-** 2. Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Maharashtra Co-operative societies Act, 1960, Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.), and guidelines issued by the RBI / NABARD, the Registrar of Co-Operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error. **Auditor's Responsibility-** 3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the applicable Standards by The Institute of Chartered Accountants of India and under the MCS Act / BR Act / RBI guidelines. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement. 4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements. 5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion. **Opinion-** 6. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.) as well as the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, the Maharashtra Co-operative Societies Rules 1961, and guidelines issued by NABARD and guidelines issued by RBI and Registrar of Co-operative societies, Maharashtra in the manner so required for the bank and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

a) in the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at **31st March,2026**
b) in the case of Profit and Loss Account, of the Profits for the year ended on that date; and
c) in the case of Cash Flow Statement, of the cash flows for the year ended on that date.

**Report on Other Legal and Regulatory Requirements-** 7. The Balance Sheet and the Profit and Loss Account and the Cash Flow Statement have been drawn up in accordance with the provisions of Section 29 of the Banking Regulation Act, 1949 read with provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 & Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

8. **We report that**:- a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.
b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches / offices;
c) The transactions of the Bank, which have come to our notice, are within the powers of the Bank.
d) The Balance Sheet and the Profit & Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;
e) The accounting standards adopted by the bank are consistent with those laid down by accounting principle generally accepted in India so far as applicable to the Bank.

9. As per the information and explanation given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rule 1961.

10. We further report that for the year under audit, the bank has been awarded **"A"** classification.

**PLACE :- NASHIK**
**DATE :- 29/06/2026**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**Chartered Accountants**
**FRN. 1103382W**
**CA. ROHIT BAFNA**
**Partner**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**
**UDIN : 26113955TSZWJI9149**

## P A R A M & ASSOCIATES
## (Formerly Known as M/s. R R GUJARATHI & CO.)
## Chartered Accountants

33, JITO Business Bay, Near Mumbai Naka, Nashik - 422002
Tel Phone - 0253-2572218/4065317 Email :- paramandassociate@gmail.com

**AUDIT CLASSIFICATION LETTER**

As per the norms of Audit Classification of Primary Urban Co-operative Bank and as per the Guidelines of Commissioner for Co-operation & Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Pune - 411 001, We are pleased to award **"A"** Class to **"Ahmednagar Merchant's Co-Op. Bank Ltd.(Scheduled Bank)" Ahilyanagar**, Plot No. 33, Market Yard, Station Road, Ahilyanagar-414001 for the year 2025-26

**PLACE :- NASHIK**
**DATE :- 29/06/2026**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**Chartered Accountants**
**FRN. 103382W**

**CA. ROHIT BAFNA**
**Partner**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**
**UDIN : 26113955TSZWJI9149**

# अर्थजगत

# चार वर्षांचे आयटीआर भरायचंय?

■ अर्थसल्ला

गेल्या काही वर्षांत जर तुमच्याकडून आयकर परतावा म्हणजेच आयटीआर दाखल करायचा राहून गेला असेल, तर घाबरून जाण्याचे कारण नाही. आयकर विभागाच्या अद्ययावत आयकर परतावा म्हणजेच आयटीआर-यु या सुविधेचा वापर करून तुम्ही मोठी दंडात्मक कारवाई आणि कायदेशीर वाद टाळू शकता.




**१ आयटीआर-यु म्हणजे काय? :** आयकर कायद्याच्या कलम १३९(८ए) अंतर्गत ही विशेष सुविधा देण्यात आली आहे. याद्वारे करदात्यांना जुन्या आयटीआरमधील चुका सुधारण्याची किंवा पूर्णपणे राहून गेलेला आयटीआर पुन्हा दाखल करण्याची संधी मिळते. नियमित आयटीआर दाखल करण्याची मुदत संपल्यानंतरही ही प्रक्रिया करता येते.

**२ चार वर्षांचा मोठा कालावधी उपलब्ध :** नियमित आयटीआर केवळ चालू आर्थिक वर्षासाठीच भरता येतो, परंतु आयटीआर-यु अंतर्गत संबंधित मूल्यांकन वर्ष संपल्यापासून पुढील चार वर्षांपर्यंत परतावा अद्ययावत करता येतो. सध्या करदाते मूल्यांकन वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ साठीचे आयटीआर-यु दाखल करू शकतात. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आयटीआर-यु भरण्याची खिडकी १ एप्रिल २०२६ रोजी उघडली असून ती ३१ मार्च २०३० पर्यंत उपलब्ध राहील.

**३ आयटीआर-यु कोण दाखल करू शकतो? :** ज्यांनी मूळ किंवा उशिरा भरायचा आयटीआर भरण्याची मुदत गमावली आहे ते हा परतावा भरू शकतात. तसेच ज्यांच्याकडून उत्पन्न कमी दाखवले गेले आहे, चुकीच्या शिर्षकाखाली उत्पन्न नोंदवले गेले आहे किंवा चुकीच्या दराने कर भरला गेला आहे, अशा करदात्यांना ही सुविधा वापरता येते. याशिवाय पूर्वी घोषित केलेले नुकसान कमी करायचे असल्यासही याचा वापर होतो.

**४ केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मधील नवीन बदल आणि शिथिलता :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये या नियमात काही महत्त्वाचे बदल सुचवून करदात्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. पूर्वी एकदा का आयकर विभागाने पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली की आयटीआर-यु भरता येत नव्हता. आता नवीन बदलानुसार, ही प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही करदाता आयटीआर-यु भरू शकतो, मात्र यासाठी त्याला लागू असलेल्या अतिरिक्त करावर आणखी १० टक्के अधिक कर भरावा लागेल. यासोबतच १ मार्च २०२६ पासून करदात्यांना पुढील वर्षांसाठी पुढे ढकललेला तोटा कमी करण्यासाठीही आयटीआर-यु वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**५ अतिरिक्त कराचा बोजा :** आयटीआर-यु मोफत भरता येत नाही. मूळ कराची रक्कम आणि व्याजासोबतच विलंबाच्या कालावधीनुसार अतिरिक्त कर भरावा लागतो. जर तुम्ही मूल्यांकन वर्ष संपल्यापासून १२ महिन्यांच्या आत आयटीआर-यु भरला, तर थकीत कर आणि व्याजाच्या २५ टक्के अतिरिक्त कर द्यावा लागतो. जर तुम्ही १२ ते २४ महिन्यांच्या दरम्यान भरला, तर हा अतिरिक्त कर ५० टक्के होतो.

**६ आयटीआर-यु केव्हा भरता येत नाही? :** शून्य किंवा तोट्याचा परतावा दाखल करण्यासाठी हा पर्याय उपलब्ध नाही. तसेच कराचा परतावा मागण्यासाठी किंवा रिफंडची रक्कम वाढवण्यासाठी आणि एकूण कर दायित्व कमी करण्यासाठी याचा वापर करता येत नाही. संबंधित वर्षासाठी आधीच एकदा आयटीआर-यु भरला असल्यास पुन्हा संधी मिळत नाही कारण एका वर्षासाठी एकदाच ही सोय असते.
याशिवाय कर विभागाकडून शोध, जप्ती किंवा चौकशीची कारवाई सुरू असल्यास हा अर्ज करता येत नाही.
सध्याच्या डिजिटल युगात बँक खाती, शेअर्स, मालमत्ता खरेदी आणि मोठ्या व्यवहारांवर कर विभागाची बारीक नजर असते, त्यामुळे नोटीस यायची वाट न पाहता स्वतःहून आयटीआर-यु भरून जुना रेकॉर्ड दुरुस्त करणे हाच कायदेशीर कारवाईपासून वाचण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

■ शेअर बाजार

# बाजार सावरताना...

गेल्या सोमवारच्या नीचांकी पातळीचा विचार केला, तर निफ्टी जवळपास १००० अंकांनी वर आला आहे. दुसरीकडे बँक निफ्टीमध्येही सुमारे ३५०० ते ४००० अंकांची मजबूत तेजी पाहायला मिळाली आहे. विशेष बाब म्हणजे, बाजारासमोर अनेक आव्हाने असताना ही तेजी आली आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत गुंतवणूकदारांमध्ये भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण होते, परंतु बाजाराने ज्या प्रकारे पुनरागमन केले आहे, त्यावरून सध्या खरेदीचा मूड मजबूत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.



सध्या बहुतांश गुंतवणूकदारांच्या मनात दोन मोठे प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे, ज्यांच्याकडे आधीपासूनच खरेदीची पोझिशन आहे त्यांनी काय करावे? आणि दुसरा प्रश्न, ज्यांची ही तेजी चुकली आहे त्यांनी आता काय करावे? पहिल्या प्रश्नाचे उत्तर तुलनेने सोपे आहे. जर तुम्ही आधीपासूनच बाजारात असाल आणि तुमचे सौदे फायद्यात असतील, तर ते घाईघाईने बंद करण्याची गरज नाही. स्टॉप लॉस हळूहळू वर सरकवत ट्रेंडसोबत टिकून राहणे अधिक चांगले ठरेल. बाजार सध्या अशा स्थितीत आहे जिथून मोठ्या तेजीची सुरुवात होऊ शकते. अशा वेळी केवळ छोटे-छोटे चढ-उतार पाहून बाहेर पडणे योग्य रणनीती ठरणार नाही.

या तेजीच्या चालीतच नवीन बुल रनची उत्तरे दडली आहेत. निफ्टीने यापूर्वी सप्टेंबर २०२४ आणि जानेवारी २०२६ मध्ये २६,३०० च्या आसपास दोनदा उच्चांक गाठला होता. विशेष म्हणजे, दोन्ही वेळा घसरणीदरम्यान बाजार जवळपास सारख्याच पातळीवर सावरला. याचा अर्थ बाजाराने आपले मजबूत सपोर्ट कायम ठेवले आहेत. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांच्या प्रचंड विक्रीतही बाजाराने आपले महत्त्वाचे तळ तोडले नाहीत. म्हणूनच आता पुन्हा एकदा २६,३०० च्या पातळीची चर्चा सुरू झाली असून, बाजाराची मजबूती अशीच राहिली तर आगामी महिन्यांत ही पातळी पुन्हा पाहायला मिळू शकते.

जागतिक घडामोडींमुळेही बाजाराला मोठा दिलासा मिळाला आहे. अमेरिका आणि इराणमधील करारामुळे बाजाराची चिंता काहीशी कमी झाली आहे. दोन्ही देशांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून होर्मुझची खाडी पुन्हा खुली करण्याच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. जागतिक तेल पुरवठ्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हा मार्ग पूर्णपणे पूर्ववत झाल्यास कच्च्या तेलाच्या किमतींवरील दबाव कमी होऊ शकतो, जी भारतासारख्या तेल आयातदार देशासाठी सकारात्मक बातमी आहे. दुसरीकडे, अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कोणताही बदल केलेला नाही, मात्र त्यांच्या वक्तव्यात महागाईबाबत थोडी कडक भूमिका नक्कीच दिसून आली. फेडच्या या भूमिकेनंतर अमेरिकन बाँड यील्ड वाढले आणि डॉलर मजबूत झाला, ज्यामुळे अमेरिकन बाजारात काहीशी घसरण झाली. परंतु, भारतीय बाजारावर याचा फारसा नकारात्मक परिणाम झाला नाही, जो भारतीय बाजाराच्या अंतर्गत ताकदीचा पुरावा आहे. सध्या पीएसयू बँक, ऑटो, रिअल इस्टेट आणि एनबीएफसी शेअर्समध्ये सर्वाधिक मजबूती दिसून येत आहे. आयटी क्षेत्रातही सुधारणांचे संकेत असून अनेक शेअर्सनी 'डबल बॉटम'सारखा तांत्रिक पॅटर्न तयार केला आहे. मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये तर वेगळीच तेजी असून अनेक कंपन्या सलग नवीन उच्चांक गाठत आहेत. तथापि, गुंतवणूकदारांनी त्यांच्या पोर्टफोलिओचे पुनरावलोकन करून खराब कामगिरी करणाऱ्या शेअर्सचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

सध्याच्या बाजारपेठेतील सर्वात मोठा धडा हाच आहे की प्रत्येक तासाच्या चढ-उताराला पकडण्याचा प्रयत्न करू नका. हा बाजार सध्या पोझिशनल गुंतवणूकदारांना अधिक फायदा देत आहे. त्यामुळे दर ५० किंवा १०० अंकांच्या हालचालीवर निर्णय घेण्याऐवजी मोठ्या ट्रेंडवर लक्ष केंद्रित करणे अधिक फायदेशीर ठरेल.

जागतिक अनिश्चिततेनंतरही भारतीय बाजाराने दाखवलेली ही लवचिकता पाहता, आगामी काळात कंपन्यांचे निकाल अपेक्षेनुसार लागल्यास बाजारात व्यापक तेजी पाहायला मिळू शकते.



**पती-पत्नी एकमेकांपासून वेगळे झाल्यास किंवा त्यांच्यात घटस्फोट झाल्यास केवळ भावनिकच नाही, तर अनेक आर्थिक प्रश्नही निर्माण होतात. अशा कठीण काळात आयुर्विमा पॉलिसी आणि मुलांच्या भविष्यकालीन योजनांचे काय होते आणि मुलांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी काय पावले उचलली पाहिजेत, याबद्दल जाणून घेणे गरजेचे आहे.**

# पती-पत्नी वेगळे झाल्यास पॉलिसींचे काय होते?

पतीने किंवा पत्नीने एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला तरी विमा कंपनीच्या नियमांनुसार आयुर्विमा पॉलिसी आपोआप रद्द किंवा अमान्य ठरत नाही. या पॉलिसीचे काय होणार, हे प्रामुख्याने पॉलिसीधारक कोण आहे यावर अवलंबून असते. विमा कायद्यानुसार ज्या व्यक्तीच्या नावावर पॉलिसी आहे आणि जी व्यक्ती तिचे पैसे भरते, त्या पॉलिसीवर आणि त्यातून मिळणाऱ्या मॅच्युरिटीच्या रक्कमेवर सर्व कायदेशीर हक्क त्याच व्यक्तीचे असतात.

लग्नानंतर बहुतांश लोक आपल्या आयुर्विमा पॉलिसीमध्ये जोडीदारालाच 'नॉमिनी' म्हणजेच वारसदार म्हणून नियुक्त करतात. परंतु, विभक्त झाल्यानंतर जर पॉलिसीधारकाला आपल्या पश्चात्त ती रक्कम जोडीदाराला मिळू नये असे वाटत असेल, तर विमा कंपनीकडे अर्ज करून नॉमिनीचे नाव बदलणे आवश्यक आहे. जर मुलांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल, तर त्यांना नॉमिनी करताना एका विश्वासू सज्ञान व्यक्तीला 'पालक' म्हणून नियुक्त करावे लागते.

३. चाइल्ड प्लॅन्स आणि युलिपचे काय होते?

मुलांच्या शिक्षणासाठी किंवा लग्नासाठी काढलेल्या चाइल्ड इन्शुरन्स पॉलिसी किंवा युलिप प्लॅन्सबाबत पालकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

* पॉलिसी तुमच्या नावावर असेल आणि तुम्हीच तिचे हप्ते भरत असाल, तर मॅच्युरिटीचे पैसे तुम्हालाच मिळतील. मुलांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी तुम्ही या पैशांचा वापर करू शकता.

* जर ही पॉलिसी दोघांनी मिळून किंवा संयुक्त खात्यातून काढली असेल, तर परस्पर संमतीने तिचे हप्ते कोण भरणार हे ठरवणे गरजेचे आहे. जेणेकरून पॉलिसी बंद पडणार नाही.

* पॉलिसी हस्तांतरण करण्याचा पर्याय

विभक्त होताना जर मुलांचा ताबा पत्नीकडे असेल आणि पॉलिसी पतीच्या नावावर असेल, तर पती ती पॉलिसी पूर्णपणे पत्नीच्या किंवा मुलांच्या नावावर हस्तांतरित करू शकतो. एकदा पॉलिसी हस्तांतरित झाली की, भविष्यातील हप्ते भरण्याची जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीलाच तिचे सर्व कायदेशीर लाभ मिळतात.

परस्पर संमतीच्या करारात नोंद करणे गरजेचे

भविष्यातील कायदेशीर वाद आणि गैरसमज टाळण्यासाठी विभक्त होताना किंवा घटस्फोटाचा मसुदा तयार करताना विमा पॉलिसींबाबत खालील गोष्टी स्पष्टपणे लिहून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे:

* **संबंधित पॉलिसीचे हप्ते पुढे कोण भरणार?**
* **मूळ पॉलिसीधारक कोण राहणार?**
* **पॉलिसीची मुदत संपल्यावर मिळणारे पैसे कोणाला मिळणार?**
* **मुलांच्या नावावर असलेल्या पॉलिसींचे व्यवस्थापन कसे केले जाईल?**

वैवाहिक नाते संपुष्टात आले तरी मुलांचे आर्थिक भविष्य सुरक्षित राहणे गरजेचे आहे. त्यामुळे केवळ भावनिक विचारांमध्ये न गुंतता, कायदेशीर करारात विमा पॉलिसींचा स्पष्ट उल्लेख करून घेणे हाच दोन्ही बाजूंच्या आणि मुलांच्या हिताचा सर्वोत्तम मार्ग ठरतो.

# फ्युचर्स-ऑप्शनचे व्यवहार लपवताय?

फ्युचर्स अँड ऑप्शन्स बाजारात व्यवहार करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठीच्या आयटीआर-३ फॉर्ममध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. ट्रेडर्सनी या फॉर्ममधील नवीन रकाने रिकामे सोडले, तर त्यांचा आयकर परतावा 'त्रुटीयुक्त' (डिफेक्टिव्ह रिटर्न) ठरवला जाऊ शकतो. आयकर विभागाने नवीन आयटीआर-३ फॉर्ममध्ये 'शेड्यूल पार्ट ए ट्रेडिंग अकाउंट' अंतर्गत विशेष नवीन रकाने जोडले आहेत. पूर्वीच्या फॉर्ममध्ये ही स्वतंत्र सोय नव्हती. आता फ्युचर्स आणि ऑप्शन्स व्यवहार करणाऱ्यांना दोन गोष्टी स्वतंत्रपणे स्पष्ट कराव्या लागणार आहेत:

१. या व्यवहारांमधून झालेली एकूण उलाढाल
२. मिळालेले आणि नफा-तोटा खात्यात जमा झालेले एकूण उत्पन्न



यासोबतच इंट्राडे म्हणजेच एकाच दिवसात होणाऱ्या शेअर्सच्या खरेदी-विक्रीची उलाढाल आणि उत्पन्नही याच शेड्यूल अंतर्गत एकाच ठिकाणी नोंदवणे बंधनकारक केले आहे.

**फॉर्म रिकामे सोडल्यास काय होणार?**

तुम्ही फ्युचर्स अँड ऑप्शन्स व्यवहार केले असतील आणि नवीन रकाने रिकामे सोडले, तर आयकर विभागाकडून तुमची फाईल त्रुटीयुक्त परतावा म्हणून चिन्हांकित केली जाईल. ही चूक दिलेल्या मुदतीत सुधारली नाही, तर तुमचा परतावा अवैध मानला जाऊ शकतो, यामुळे पुढील कायदेशीर अडचणी वाढू शकतात. बाजारात फ्युचर्स अँड ऑप्शन्स क्षेत्रात सर्वसामान्य गुंतवणूकदारांची संख्या कमालीची वाढली आहे. सेबीच्या अहवालानुसार, या क्षेत्रात व्यवहार करणाऱ्या १० पैकी ९ लोकांना तोटा सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत, या व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणणे आणि कर विभागाला प्रत्येक व्यवहाराचा अचूक मागोवा ठेवता येणे सोपे व्हावे, यासाठी हे कडक नियम लागू करण्यात आले आहेत.

**आयटीआर-३ का आवश्यक आहे?**
अनेक छोटे ट्रेडर्स अनवधानाने आयटीआर-४ फॉर्म भरतात आणि व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती लपवतात. परंतु, फ्युचर्स अँड ऑप्शन्स मधून मिळणारे उत्पन्न हे व्यावसायिक उत्पन्न मानले जात असल्यामुळे ट्रेडर्ससाठी आयटीआर-३ फॉर्म भरणेच बंधनकारक आहे.

■ सल्ला मोलाचा

# नव्या कररचनेतील नव्या करसवलती




**नवीन कर रचनेत नोकरदार वर्गासाठी करसवलतींचे अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयटीआर (आयकर परतावा) दाखल करताना पगारदार कर्मचाऱ्यांना नवीन कर रचनेअंतर्गत मिळणारे हे फायदे जाणून घेणे गरजेचे आहे.**

**१ ७५,००० रुपयांची प्रमाणित वजावट :** पगारदार कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी प्रमाणित वजावटीची मर्यादा ५०,००० रुपयांवरून वाढवून ७५,००० रुपये करण्यात आली आहे. हा लाभ कोणताही खर्च किंवा गुंतवणुकीचा पुरावा न देता थेट उत्पन्नातून वजा केला जातो.

**२ १२,००,००० रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर पूर्ण करमाफी :** कलम ८७ए अंतर्गत मिळणाऱ्या करातील सवलतीची मर्यादा वाढवण्यात आली आहे. आता नवीन कर रचनेत ज्यांचे करपात्र उत्पन्न १२,००,००० रुपयांपर्यंत आहे, त्यांना ६०,००० रुपयांची पूर्ण सूट मिळते, ज्यामुळे त्यांचा एकूण कर शून्य होतो. प्रभावी करमुक्त उत्पन्न: जर एखाद्या कर्मचाऱ्याचे एकूण वेतन १२,७५,००० रुपये असेल, तर ७५,००० रुपयांची प्रमाणित वजावट मिळाल्यानंतर त्याचे करपात्र उत्पन्न १२,००,००० रुपये होईल. त्यामुळे कलम ८७ए च्या सवलतीमुळे त्याला एकही रुपया कर भरावा लागणार नाही.

**३ राष्ट्रीय पेन्शन योजनेतील नियोक्ताचे योगदान :** कलम ८०सीसीडी(२) अंतर्गत, तुमच्या कंपनीने किंवा मालकाने तुमच्या एनपीएस खात्यात भरलेली रक्कम करमुक्त असते. नवीन कर रचनेत ही मर्यादा मूळ वेतनाच्या १४ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे, जी जुन्या रचनेत केवळ १० टक्के होती.

**४ कौटुंबिक पेन्शनवर वजावट :** मृत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकांना मिळणाऱ्या कौटुंबिक पेन्शनवर नवीन कर रचनेत मोठी सवलत देण्यात आली आहे. मिळालेल्या पेन्शनच्या एक-तृतीयांश भाग किंवा २५,००० रुपये (यापैकी जे कमी असेल ते) करमुक्त राहील. पूर्वी ही मर्यादा १५,००० रुपये होती.

**५ भाड्याने दिलेल्या मालमत्तेच्या गृहकर्जावरील व्याज :** नवीन कर रचनेत स्वतः राहत्या घराच्या कर्जावरील व्याजावर सूट मिळत नसली, तरी भाड्याने दिलेल्या मालमत्तेवरील गृहकर्जाचे संपूर्ण व्याज तुम्ही भाड्याच्या उत्पन्नातून वजा करू शकता.

**६ अधिकृत कामाशी संबंधित भत्ते :** कामाच्या ठिकाणी किंवा प्रवासादरम्यान होणाऱ्या काही विशिष्ट खर्चाचे भत्ते नवीन कर रचनेतही करमुक्त आहेत. यामध्ये कामानिमित्त प्रवास करताना किंवा बदलीनंतर होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती, अधिकृत दौऱ्यावर असताना रोजच्या खर्चासाठी मिळणारी रक्कम, ऑफिसच्या कामासाठी स्थानिक प्रवासाला लागणारा खर्च, दिव्यांग व्यक्तींना ऑफिसला येण्या-जाण्यासाठी मिळणारा भत्ता यांचा समावेश आहे.

**७ सेवानिवृत्तीचे लाभ :** नोकरी सोडताना किंवा सेवानिवृत्त होताना मिळणारे काही लाभ नवीन कर रचनेत पूर्णपणे करमुक्त ठेवण्यात आले आहेत: ग्रॅच्युइटी: विहित मर्यादेपर्यंत पूर्ण सूट. रजा रोखीकरण: बिगर सरकारी कर्मचाऱ्यांसाठी २५,००,००० रुपयांपर्यंतचे रजा रोखीकरण करमुक्त आहे. व्हीआरएस: स्वेच्छानिवृत्ती दरम्यान मिळणारी ५,००,००० रुपये पर्यंतची रक्कम करमुक्त असते.

# एकाहून अधिक पीपीएफ खाती आहेत?

सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीपीएफ हे देशातील अत्यंत लोकप्रिय आणि सुरक्षित करबचतीचे साधन आहे. परंतु, अनेकदा गुंतवणूकदार माहितीअभावी किंवा अधिक व्याजाच्या आमिषाने वेगवेगळ्या बँकांमध्ये किंवा पोस्ट ऑफिसमध्ये एकापेक्षा जास्त पीपीएफ खाती उघडतात. असे करणे कायद्याने बेकायदेशीर असून यामुळे तुमचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

**■ पीपीएफ खात्याचा मुख्य नियम**

आयकर आणि सरकारी नियमांनुसार, संपूर्ण देशात कोणत्याही एका व्यक्तीच्या नावावर केवळ एकच पीपीएफ खाते असू शकते. तुम्ही पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडा किंवा कोणत्याही सरकारी अथवा खाजगी बँकेत, तुमचे एकूण खाते एकच असायला हवे. पीपीएफ खाते उघडताना अर्जामध्ये माझे इतर कोणतेही पीपीएफ खाते अस्तित्वात नाही असे स्पष्ट प्रतिज्ञापत्र द्यावे लागते.

**■ दोन खाती उघडल्यास काय होते?**

एखाद्या व्यक्तीने अनवधानाने किंवा चुकून दुसरे पीपीएफ खाते उघडले, तर त्या दुसऱ्या खात्याला अनियमित खाते मानले जाते. या संदर्भातील कडक नियम असे -



■ दुसऱ्या अनियमित खात्यामध्ये तुम्ही जमा केलेल्या कोणत्याही रक्कमेवर सरकारकडून एकही रुपया व्याज दिला जात नाही.

■ आयकर कायद्याच्या कलम ८०सी अंतर्गत मिळणारी दीड लाख रुपयांची कर सवलत केवळ पहिल्या (कायदेशीर) खात्यावरील गुंतवणुकीलाच लागू होते. दुसऱ्या खात्यातील गुंतवणुकीवर कोणताही कर लाभ मिळत नाही.

■ जोपर्यंत या दोन्ही खात्यांचे कायदेशीर एकत्रीकरण होत नाही, तोपर्यंत दुसऱ्या खात्यातून पैसे काढता येत नाहीत किंवा ते खाते बंदही करता येत नाही.

**■ अल्पवयीन मुलांच्या नावावरील खात्याचा नियम**

पालक आपल्या अल्पवयीन मुलांच्या नावावर स्वतंत्र पीपीएफ खाते उघडू शकतात आणि हे खाते पालकांच्या स्वतःच्या खात्यापेक्षा वेगळे मानले जाते. मात्र, येथे दोन महत्त्वाचे नियम आहेत:

मुलाच्या खात्यात आई किंवा वडील यांपैकी केवळ एकाच पालकाला 'पालक' म्हणून नोंदवता येते. दोन्ही पालकांनी एकाच मुलासाठी वेगळी खाती उघडल्यास ते अनियमित मानले जाते.

पालकाचे स्वतःचे खाते आणि मुलाचे खाते या दोन्हींमधील वार्षिक गुंतवणूक मिळून एकूण मर्यादा १,५०,००० रुपयांपेक्षा जास्त नसावी. यापेक्षा अधिक जमा झालेली रक्कम व्याज आणि कर सवलतीसाठी अपात्र ठरते.

**■ चूक दुरुस्त कशी करावी?**

जर तुमच्याकडून एकापेक्षा जास्त पीपीएफ खाती उघडली गेली असतील, तर ती लपवून ठेवण्याऐवजी स्वतःहून पुढे येऊन ती एकत्र करणे हाच एकमेव मार्ग आहे. यासाठी खालील प्रक्रिया करावी लागते. तुम्हाला तुमच्या दोन्ही बँकांमध्ये किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन खात्यांचे सविस्तर तपशील गोळा करावे लागतील.

त्यानंतर, ही दोन्ही खाती एकत्र करण्याची परवानगी मागण्यासाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाला लेखी अर्ज करावा लागतो.

वित्त मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर, दुसऱ्या खात्यातील मूळ रक्कम (व्याजाशिवाय) तुमच्या पहिल्या मुख्य खात्यात वर्ग केली जाते आणि दुसरे खाते अधिकृतपणे बंद केले जाते. गुंतवणूकदारांनी एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पीपीएफ खाते हस्तांतरित करणे पूर्णपणे कायदेशीर आहे, परंतु एकाच वेळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी सक्रिय खाती ठेवणे आर्थिक दंडाला आमंत्रण देणारे ठरू शकते.

# चेतन रेपाळे, निलेश उचाळे, सोनाली मंडलिक यांची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड





नगर – हरियाणा येथील रोहतक येथे होणाऱ्या २३ वर्षाखालील राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील ३ मल्लांची निवड झाली आहे. यामध्ये पारनेर येथील उत्कृष्ट मल्ल चेतन रेपाळे व निलेश उचाळे आणि कर्जतची आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू सोनाली मंडलिक यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

ही स्पर्धा १० ते १२ जुलै २०२६ या कालावधीत रोहतक येथभल महर्षी दयानंद विद्यापीठ येथे पार पडणार आहे. यामध्ये फ्री–स्टाईल आणि ग्रीको–रोमन अशा दोन्ही प्रकारांत मुले आणि मुलींच्या विविध वजन गटात लढती होणार आहेत. यामध्ये पारनेरचा मल्ल चेतन रेपाळे याची १२५ किलो वजनी गटात फ्री–स्टाईल क्रीडा प्रकारात निवड झाली आहे. चेतनसोबतच शिरापूरचा उदयोन्मुख मल्ल निलेश उचाळे याची ८२ किलो वजनी गटात तर कर्जतची गोल्डन गर्ल म्हणून नावाजलेली कुस्तीपटू सोनाली मंडलिक हिची ६५ किलो वजनी गटात निवड झाली आहे.

चेतन रेपाळे याने गेल्या काही महिन्यांत लाल मातीत आणि मॅटवरही आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत एकापाठोपाठ एक अनेक मानाचे किताब पटकावले आहेत. त्याची हीच सातत्यपूर्ण कामगिरी लक्षात घेऊन त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. नुकत्याच नाशिक येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत चेतनने कोल्हापूरच्या बलाढ्य मल्लावर अस्मान दाखवत प्रतिष्ठेचा तपोवन हनुमान केसरी हा किताब आणि चांदीची गदा आपल्या नावावर केली होती. वाघोली येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत त्याने कांस्यपदक पटकावले होते. तर विभागीय कुस्ती स्पर्धेत आपल्या आक्रमक डावांच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना नमवत तो उत्तर महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरला होता.

पैलवान निलेश उचाळे हा महाराष्ट्रातील उदयोन्मुख मल्ल म्हणून नावारुपाला आला आहे. मधुकर उचाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या निलेश उचाळे याने यापूर्वी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ६९ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे. दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते.

कर्जत तालुक्यातील कापरेवाडी येथील आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू पैलवान सोनाली मंडलिक ही ६५ किलो वजनी गटातून राष्ट्रीय स्पर्धेत उतरणार आहे. सोनालीने खेलो इंडिया स्पर्धेत नुकतेच सुवर्णपदक पटकावले आहे. याशिवाय, युरोपच्या महिला पैलवानांचा पराभव करत तिने अहिल्या केसरी हा मानाचा किताबही पटकावला आहे. राष्ट्रीय स्पर्धांमध्ये आत्तापर्यंत ४० पदके जिंकण्याचा विक्रमही सोनाली मंडलिकने प्रस्थापित केला आहे.



ऑलिम्पियाड परीक्षेत यश मिळविलेले गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी.

## गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे 'ऑलिम्पियाड'मध्ये यश

नगर – गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, तपोवन रोड, अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांनी विविध ऑलिम्पियाड परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

विद्यार्थिनी शाजिया समीरखान पठाण हिने नॅशनल सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक व कांस्यपदक पटकावले. तसेच तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक मिळवून शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिला रु. १,००० चे व्हाउचर प्रदान करण्यात आले आहे. तसेच सबुरी राकेश शिंगारे हिने NSO परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत रु. ५०० चे व्हाउचर प्राप्त केले आहे.

याशिवाय उमैझा काझिम सय्यद, आदित्य मुळे, अदीबा खान आणि शुभम जितेंद्र पाल यांनी इंटरनॅशनल हिंदी ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करून प्रत्येकी रु. ५०० चे व्हाउचर मिळविले आहे.

या विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी NSO समन्वयक शीतल रहाणे आणि IHO समन्वयक वैशाली कर्डिले यांनी मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका दिप्ती कराळे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले.

# 'हा भाऊसाहेब नाही', तर 'खाऊसाहेब वाकचौरे' आहे

### याच्या नसानसात गद्दारी; सापडला तर सोडू नका; जिथे जातो, तिथे बट्ट्याबोळ होतो



शिर्डी – हा भाऊसाहेब नाही, खाऊसाहेब वाकचौरे आहे. जाऊ तिथं खाऊ, याच्या नसानसात गद्दारी आहे. सापडला तर सोडू नका. हा जेथे जातो, तेथे बट्ट्याबोळ होतो. या गद्दाराला पहिल्यांदा आपण २००९ ला निवडून दिलं होतं आणि २०१४ ला हा पळाला होता. हा पळाला आणि आपलं सरकार आलं. हा काँग्रेसमध्ये गेला. काँग्रेसचं सरकार पडलं, आता शाह सेनेमध्ये गेलेत, त्यांचंही सरकार पडल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका उबाठा शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे यांचे सध्या बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांमध्ये दौरे सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर २९ जून रोजी त्यांचा शिर्डी येथे कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात भाषणाला उभे राहताच ठाकरे म्हणाले, मी भाषणाला उभा राहण्यापूर्वी इथे एक अनाऊन्समेंट झाली की, कोणाच्या तरी गाडीची चावी हरवली आहे, ती सापडल्यास आणून द्यावी. मलाही तुम्हाला एक तशीच महत्त्वाची सूचना करायची आहे; आपला इथला खासदार पळाला आहे! तो जर तुम्हाला कुठे सापडला, तर त्याला सोडू नका. कारण गद्दारी त्याच्या रक्तात आहे. पण ही शिर्डी आहे, साईबाबांची शिर्डी आहे. इकडे श्रद्धा आणि सबुरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जशी आपली साईबाबांवर आहे, तशीच आपल्या कामावर, आपल्या भगव्यावर श्रद्धा आहे. पण त्याची कोणावर श्रद्धा नाही. रोज नवीन बाप! सबुरीचा तर पत्ताच नाही. थांबला असता, तर आपलं केंद्रात सरकार आलं होतं, अशा शब्दात ठाकरे यांनी भाषणाच्या सुरूवातीलाच वाकचौरे यांचा खरपूस शब्दात समाचार घेतला.

भाजपावरही त्यांनी जोरदार टीका केली. ते म्हणाले, दिल्लीत भाजपमध्ये २०२९ च्या निवडणुकीसाठी वारसदार शोधण्याची चर्चा सुरु आहे. त्यात तीन–चार नावांवर चर्चा होतेय. त्यामुळे देवेंद्र फडणवीस या शर्यतीत नको म्हणून त्यांना महाराष्ट्रातच गुंतवून ठेवण्याची सुपारी शाहसेनेच्या प्रमुखाला गद्दाराला दिली आहे. फडणवीस पंतप्रधान पदाच्या शर्यतीत येऊ नयेत म्हणून त्यांना आत्ताच बदनाम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. म्हणूनच राज्यात भाजपपेक्षा शाह सेनेची ताकद वाढवली जात आहे. जर पुढे अंतर्गत मतदानाचा विषय आलाच तर हेच फुटीर खासदार कामी येतील, असा आरोपही ठाकरे यांनी केला.

# 'अनुसूचित आरक्षणा'च्या उपवर्गीकरणासाठी जनजागृती करणारे कैलास खंदारेंवर हल्ला

### अहिल्यानगरात मातंग समाजाच्या वतीने निषेध; मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशी, पोलीस संरक्षण व आरोपींवर कठोर करा



नगर – अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी राज्यभर जनजागृती करणारे लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा अहिल्यानगर शहरातील मातंग समाजाच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून आरोपींना तातडीने अटक करावी, हल्ल्यामागील सूत्रधारांचा शोध घ्यावा तसेच कैलास खंदारे यांना शासकीय पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर सुनिल शिंदे, जयवंत गायकवाड, लक्ष्मण नीक्षे, ज्ञानेश्वर जगधने, प्रवीण वैरागर, सिताराम शिरसाठ, किरण कंगरे, लखन साळवे, संतोष उमाप, राजाराम काळे, उत्तम रोकडे, नवनाथ शिंदे, अभी मिसाळ, विशाल साळवे आणि तेजस अवचर यांच्यासह मातंग समाजातील विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ जून रोजी पहाटे राहुरी येथे आयोजित अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कैलास खंदारे हे चिखली येथील त्यांच्या निवासस्थानावरून बसस्थानकाकडे पायी जात होते. त्यावेळी जाफराबादचिखली रोडवरील बुद्धविहारपरिसरातमोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर दांडक्याने अचानक हल्ला केला. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

या घटनेत खंदारे यांना गंभीर दुखापत टळली असली, तरी सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांसाठी लढणाऱ्या नेतृत्वाच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली आहे.

या घटनेचा निषेध व्यक्त करताना सुनिल शिंदे यांनी सांगितले की, कोणत्याही वैचारिक मतभेदांचे निराकरण लोकशाही मार्गाने आणि वैचारिक पातळीवरच व्हायला हवे. मात्र कायदा हातात घेऊन संविधानाची पायमल्ली करत समाजातील नेतृत्वावर भ्याड हल्ले करणे कदापि सहन केले जाणार नाही. अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच घटनास्थळ परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज जप्त करून आरोपींचा तातडीने शोध घ्यावा, हल्ल्यामागील सूत्रधारांचा पर्दाफाश करावा आणि कैलास खंदारे यांना तात्काळ शासकीय पोलीस सुरक्षा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

सामाजिक न्यायासाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या नेतृत्वावर झालेल्या या हल्ल्यामुळे विविध सामाजिक संघटनांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. राज्य सरकारने या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देत दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील अपहार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी



### दानपेटीतील अर्पणातील अपहार, हे महापापच; मंदिरांचे व्यवस्थापन भक्तांकडेच हवे : हिंदु जनजागृती समिती

नगर – अयोध्येतील श्रीराममंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते जगभरातील कोट्यवधी हिंदूंच्या शतकानुशतकांच्या बलिदान, प्रदीर्घ संघर्ष आणि श्रद्धा यांचे प्रतीक आहे. मंदिराच्या दानपेटीतील अर्पणात अपहार करणे, हे महापाप असून प्रभू श्रीराम त्यांच्या कर्माची शिक्षा त्यांना देईलच. पण शासनाने या प्रकरणी कोण दोषी आहेत, याचा शीघ्रतेने तपास करून सत्य जनतेसमोर आणायला हवे आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई करायला हवी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

आम्ही यापूर्वी ही मागणी अनेकदा केली आहे की, कोणत्याही मंदिराच्या समितीमध्ये केवळ भगवंताचे भक्तच असायला हवेत. भक्त हा ईश्वराचा उपासक असल्याने तो देवनिधी चोरण्याचा विचार स्वप्नातही करू शकत नाही. खऱ्या अर्थाने मंदिरांचा उद्धार करायचा असेल, तर भगवंताचे असे भक्तच मंदिर व्यवस्थेमध्ये असावेत. अशा प्रकरणांमुळे 'मंदिर सरकारीकरण' करण्याचा प्रयत्न शासन करत असते, त्याला आमचा कायम विरोध राहिल, अशी भूमिकाही समितीने घेतली आहे.

जे सरकारी अधिकारी स्वतः भ्रष्ट असतात, जे सरकारी अधिकारी शासन यंत्रणेत खोलवर रुजलेल्या भ्रष्ट व्यवस्थेचा भाग असतात, ते सरकारी अधिकारी मंदिर समितीतील भ्रष्टाचार कसा काय रोखू शकतील. त्यामुळे धार्मिक स्थळी धर्मनिरपेक्ष शासनाचा हस्तक्षेप नकोच. मंदिरांचे सरकारीकरण केल्यानंतर मंदिराच्या निधीमध्ये भ्रष्टाचार वाढला असल्याची अनेक उदाहरणे देशभरात आहेत. या दृष्टीने भगवंताचा खरा भक्त, जो मंदिराचे दायित्व भगवंताची सेवा म्हणून स्वीकारून करेल, अशा भक्तांकडे मंदिरांचे दायित्व सोपवायला हवे, असे मत हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी व्यक्त केले.

# त्याग, सत्य, न्याय, संयम आणि मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा 'मोहरम'

### आलम खान यांचे प्रतिपादन; शफी हज टुर्स च्यावतीने मोहरम निमित्त विद्यार्थ्यांना वह्या वाटप



मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने मोहरम निमित्त शफी हज टुर्सच्या सहकार्याने गोविंदपुरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फकीरवाडा येथे विद्यार्थ्यांना वहया वाटप करण्यात आले.

नगर – मोहरम हा केवळ इस्लामी नववर्षाचा प्रारंभ किंवा धार्मिक स्मरणाचा काळ नसून, तो त्याग, सत्य, न्याय, संयम आणि मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा पवित्र महिना आहे. करबला येथे इमाम हुसैन (र.अ.) यांनी अन्यायाविरुद्ध उभे राहून सत्य आणि न्यायासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांचा संदेश आजही संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. इमाम हुसैन (र.अ.) यांनी आपल्याला शिकवले की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी सत्याचा मार्ग सोडायचा नाही, गरजूंची मदत करायची आणि समाजात प्रेम, बंधुता व मानवतेची भावना जपायची. त्यांच्या जीवनातून मिळणारी ही शिकवण प्रत्येकाने आपल्या आचरणात आणणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन शफी हज टुर्सचे संचालक हाजी आलम खान यांनी केले.

मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने मोहरम निमित्त शफी हज टुर्सच्या सहकार्याने गोविंदपुरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फकीरवाडा येथे विद्यार्थ्यांना वहया वाटप करण्यात आले. याप्रसंगी हाजी आलम खान, तनवीर चष्मावाला, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, मुख्याध्यापिका अंजुम अब्दुल गफुर शेख, दिलशाद मुसा शेख, सुम्मैया मोसिन पठाण आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना तन्वीर चष्मावाला म्हणाले की, आजच्या काळात अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहतात, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, शिक्षणाची प्रेरणा मिळते आणि समाजात परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होते. सुत्रसंचालन शेख अंजुम यांनी केले. सुम्मैया पठाण यांनी आभार मानले.

# अभिनेत्री अमीषा पटेल यांच्या हस्ते ब्रह्माकुमारीजच्या सोनई सेवाकेंद्र 'नॅशनल प्रेस्टिज ॲवॉर्ड'ने सन्मानित



नगर – नवी दिल्लीतील रॅडिसन ब्लू हॉटेल येथे आयोजित समारंभात ब्रह्माकुमारीजच्या सोनई सेवा केंद्राला नॅशनल प्रेस्टिज अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कहो ना... प्यार है' आणि 'गदर: एक प्रेम कथा' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या बॉलीवूड अभिनेत्री अमीषा पटेल यांच्या हस्ते सोनई सेवा केंद्राच्या संचालिका बी.के. उषा दीदी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बी.के. डॉ. दीपक हरके हे देखील उपस्थित होते.

गावांना आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम, व्यसनमुक्त बनवण्याच्या उद्देशाने राजयोग शिबिरे, व्यसनमुक्ती मोहिमा आणि महिला व युवा सक्षमीकरणाचे उपक्रम आयोजित केल्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या पुरस्कार विजेत्यांना संबोधित करताना, बी.के. उषा दीदींनी सर्वांना संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली आणि ध्यान शिकण्यासाठी त्यांच्या जवळच्या सेवा केंद्राला भेट देण्याचे आवाहन केले.

# स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था आयोजित मराठा वधू-वर परिचय मेळाव्यास प्रतिसाद



नगर – स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था संचलित स्वराज्य मराठा वधू–वर सूचक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठा वधू–वर परिचय मेळाव्यास समाजबांधवांचा प्रतिसाद लाभला. सावेडी येथील शिवतीर्थ येथे झालेल्या या मेळाव्यात उच्चशिक्षित, व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या विवाहेच्छुक युवक–युवतींसह त्यांच्या पालकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास उद्योजक शिवजीत डोके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते वधू–वर नोंदणी फॉर्मचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बदलत्या सामाजिक परिस्थितीत विवाह प्रक्रियेसमोर उभ्या राहणाऱ्या विविध आव्हानांवर भाष्य केले. वाढत्या अनधिकृत मध्यस्थांमुळे अनेक कुटुंबांची फसवणूक होत असल्याचे नमूद करत, विश्वासार्ह आणि पारदर्शक माध्यमातून विवाह जुळवणी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांचा विश्वास, संस्कार आणि नात्यांचा पवित्र बंध असतो. त्यामुळे योग्य माहिती, पारदर्शक प्रक्रिया आणि विश्वासार्ह व्यासपीठ यांना विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

मेळाव्यात सहभागी झालेल्या युवक–युवतींना एकमेकांशी परिचय करून घेण्याची तसेच पालकांना परस्पर संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे विवाह जुळवणीची प्रक्रिया अधिक सुलभ आणि विश्वासार्ह ठरण्यास या उपक्रमाची मोलाची मदत होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी संस्थेच्या वतीने भविष्यातही अशाच प्रकारचे वधू–वर परिचय मेळावे, सामुदायिक विवाह सोहळे तसेच समाजोपयोगी विविध उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. समाजातील गरजू घटकांना मदत, विवाह जुळवणीसाठी विश्वासार्ह व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणे, हा संस्थेचा उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी दोन तीन वर्षे झाली योगाला येत आहे. योग म्हणजे जोडणे. त्याप्रमाणे मी योगाला येऊन या सर्व योग कुटुंबाशी जोडली गेली आहे. मी आपले योगशिक्षक अनिल मेहेर सर यांच्या मार्गदर्शनाखाली योगा करत आहे. योगामुळे माझे शरीर लवचिक बनले आहे. कुठल्याही कामात आळस येत नाही. दिवसभर शरीर आनंदी आणि उत्साही राहते. आत्मविश्वास वाढला आहे. योगाला येण्यापूर्वी मला पाठीच्या मणक्याचा त्रास होता. थोड जरी काम केले तरी मणक्यावर सूज यायची, पाय दुखायचे, वाकायला त्रास व्हायचा पण योगाला येऊन माझ्या मणक्याचा त्रास कमी झाला आहे. मी वाकू शकते आणि उड्या मारता यायला लागल्या आणि कधी कधी झुंबा डान्स पण करते. याचे सगळे श्रेय आपले योगशिक्षक श्री. मेहेर सर यांना जाते. तर खूप खूप धन्यवाद मेहेर सर.



'जर रोज कराल योग तर शरीर राहील निरोगी'

– **ज्योती खताळ**, अहिल्यानगर

